थोडे परि निरे। अविट ते घ्यावे खरे ॥
घ्यावे जेणे नये तुटी। बीज वाढे बीजा पोटी ॥

# क्रांतिअग्रणी पर्व

प्रबोधन । संघटन । संघर्षासाठी | पाक्षिक | शनिवार, २७ जून २०२६

## वाट पाहण्याची तयारी...

*जमीन जल चुकी है, आसमान बाकी है,*
*सुखे हुए कुएँ तुम्हारा इम्तेहान बाकी है।*
*बरस जा वक्त पर ऐ मेघ,*
*किसी का मकान गिरवी है,*
*किसी का लगान बाकी है*






संस्थापक
**स्व. क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड**

संपादक मंडळ अध्यक्ष
**आ. अरुण लाड**
सदस्य, विधानपरिषद, महाराष्ट्र राज्य

संपादक : **चंद्रकांत लक्ष्मण रोकडे**
मु. पो. कुंडल, मो. 9420793103

प्रकाशक : **उमेश दत्तात्रय पेटकर**
मु.पो. कुंडल, ता. पलूस, जि. सांगली.

मालक : **अशोक पांडूरंग पवार**
मु.पो. कुंडल, ता. पलूस, जि. सांगली.

मुद्रक : **लक्ष्मी प्रिंटिंग प्रेस, कुंडल**
प्रोप्रा. गोविंद किसन डुबल

संपादन, मांडणी : **संस्कृती-पृथ्वी क्रिएशन, सांगली**
मोहन यादव - प्रशांत देसाई
८८०५००७४१६ - ९८५०९७७५०९

**RNI No.: MAHMAR/2008/24954**
**RND/53/KRANTIAGRANIPARV/2025**
**SGL/53/2025-2027**

- वर्ष : १८ वे • अंक : ४१
- शुक्रवार, दि. २७ जून २०२६
- पृष्ठे ३२ • मूल्य : ₹२०
- वार्षिक वर्गणी : ₹५००
- कार्यालयीन पत्ता:
  संपादक, 'क्रांतिअग्रणी पर्व' पाक्षिक
  मु.पो. कुंडल - ४१६ ३०९,
  ता. पलूस, जि. सांगली (महाराष्ट्र)
- email : krantiagrani@gmail.com



या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पलूस न्याय कक्षेत)


# अंतरंग


| | |
|---|---|
| E20 ते E30 इंधन धोरण... | ४ |
| गोड मक्याची फायदेशीर शेती | ७ |
| उद्ध्वस्त होणारे साम्राज्य... | ९ |
| दहाव्या वर्षी 'पॅड' सांभाळणारी मुलगी | १२ |
| जनगणनेच्या रकान्याबाहेरचा भारत! | १४ |
| भाजीपाल्याचे 'रोटेशन' | १६ |
| 'लॉजिक' शिका! | १७ |
| ग्राफिक्स | १८ |
| व्यवस्थेच्या कानाखाली आवाज | २० |
| बिभत्स कंटेंट आणि आपण | २३ |
| मला रीलस्टार व्हायचंय | २४ |
| जस्ट जोकिंग | २६ |
| बोलीचा हेल की खेळ | २७ |
| क्रांतीतर्फे एक कोटी ऊस रोपांचा पुरवठा | २९ |
| १३ लाख टन ऊस गाळपाचे लक्ष्य | ३० |
| क्रांतीची गुणवत्तेवर पुन्हा मोहोर | ३१ |

संपादकीय

# अबोल आभाळ...

*"जमीन जल चुकी है, आसमान बाकी है,*
*सूखे हुए कुएँ तुम्हारा इम्तेहान बाकी है।*
*बरस जा वक्त पर ऐ मेघ,*
*किसी का मकान गिरवी है,*
*किसी का लगान बाकी है"*

या काही ओळी केवळ एक शेर नाहीत, तर भारतातील आणि विशेषतः महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या मनातील निःशब्द आक्रोश आहेत. हा शेर वाचताना डोळ्यांसमोर उभी राहते ती उन्हाच्या काहिलीने होरपळलेली जमीन, पिके, कोरडे पडलेले ओढे-नाले, तळ गाठलेल्या विहिरी, पाण्याच्या एका हंड्यासाठी मैलोनमैल चालणाऱ्या महिला आणि आकाशाकडे आशाळभूत नजरेने पाहणारा बळीराजा. पाऊस हा त्याच्यासाठी केवळ ऋतू नसतो; तो त्याच्या आयुष्याचा आधार, कष्टाचे फळ आणि उद्याच्या जगण्याची हमी असतो.

खरे तर महाराष्ट्राला दुष्काळ नवीन नाही. अनेक दशकांपासून राज्याने दुष्काळाचे चटके सोसले आहेत. परंतु, आज हवामान बदलामुळे परिस्थिती अधिक गुंतागुंतीची झाली आहे. पावसाचे प्रमाण कमी-जास्त होण्यापेक्षा त्याचे स्वरूप बदलले आहे. महिनाभर पाऊस नाही आणि अचानक दोन दिवसांत मुसळधार पाऊस पडतो. त्यामुळे जमिनीत पाणी मुरत नाही, उलट वाहून जाते. परिणामी जलसाठे वाढत नाहीत आणि शेतीलाही अपेक्षित फायदा होत नाही. ही बदलती परिस्थिती लक्षात घेऊन जलव्यवस्थापनाचे धोरण नव्याने आखण्याची गरज आहे.

यासाठी "पाणी अडवा, पाणी जिरवा" ही संकल्पना अधिक व्यापकपणे राबवावी लागेल. प्रत्येक गावात शेततळी, सिमेंट बंधारे, गाळ काढणे, पावसाचे पाणी साठवण, ठिबक आणि तुषार सिंचनाचा वापर वाढवणे, भूजल पुनर्भरणाची प्रभावी व्यवस्था उभारणे आणि पिकांच्या निवडीत स्थानिक हवामानाचा विचार करणे ही काळाची गरज आहे. अनेक गावांनी लोकसहभागातून जलक्रांती घडवून दुष्काळावर यशस्वी मात केली आहे. अशा प्रयोगांचे अनुकरण संपूर्ण राज्यभर व्हायला हवे. सरकारनेही दुष्काळाकडे केवळ मदतीच्या घोषणा किंवा पंचनाम्यांच्या चौकटीत पाहण्याऐवजी दीर्घकालीन उपाययोजनांवर भर दिला पाहिजे. सिंचन प्रकल्प वेळेत पूर्ण होणे, पीकविमा योजनांचा पारदर्शक लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे, हवामानावर आधारित सल्ला वेळेवर उपलब्ध होणे आणि कर्जबाजारी शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक आधार मिळणे आवश्यक आहे. त्याचबरोबर पाण्याच्या वापराबाबत नागरिकांमध्येही जबाबदारीची भावना निर्माण होणे तितकेच महत्त्वाचे आहे.

आज परिस्थिती अशी आहे की, शहरांमध्ये नळातून वाहणाऱ्या प्रत्येक थेंबाचे मोल कदाचित लक्षात येत नाही; पण गावाकडे तोच एक थेंब जगण्याचा आधार ठरतो. म्हणूनच पाणी हा केवळ नैसर्गिक स्रोत नसून सामाजिक संपत्ती आहे, ही जाणीव प्रत्येकाने ठेवली पाहिजे. जलसंवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून ती प्रत्येक नागरिकाची सामूहिक चळवळ बनली पाहिजे.

आभाळ केव्हा बरसेल हे माणसाच्या हातात नाही. पण जमिनीवर पडणारा प्रत्येक थेंब जपणे, त्याचे योग्य नियोजन करणे आणि भविष्यातील पिढ्यांसाठी पाण्याची शाश्वत व्यवस्था उभारणे हे नक्कीच आपल्या हातात आहे. कारण दुष्काळ फक्त जमिनीला भेगा पाडत नाही; तो शेतकऱ्याच्या चेहऱ्यावरच्या हास्यालाही कोरडे करून टाकतो. त्यामुळे आज गरज आहे ती केवळ पावसाची वाट पाहण्याची नाही, तर पावसाच्या प्रत्येक थेंबाला भविष्याचे भांडार मानून त्याचे संवर्धन करण्याची. अन्यथा उद्या आभाळ पुन्हा अबोल राहील आणि जळत्या जमिनीवर उभा असलेला बळीराजा पुन्हा एकदा आपल्या डोळ्यांत पावसाचेच स्वप्न घेऊन क्षितिजाकडे पाहत राहील.

# E20 ते E30 इंधन धोरण...

## भारताच्या ऑटोमोबाईल क्षेत्रापुढचं नवं आव्हान

**ऊर्जासुरक्षा, परकीय चलनाची बचत आणि प्रदूषणावर नियंत्रण या तिहेरी उद्दिष्टांसाठी भारताने इथेनॉलमिश्रित इंधनाचा मार्ग स्वीकारला आहे. E20 धोरणाची अंमलबजावणी नुकतीच स्थिरावत असतानाच आता E30 इंधनाला मिळालेल्या मंजुरीमुळे वाहन उद्योग, ग्राहक आणि धोरणकर्त्यांसमोर नवी समीकरणे उभी ठाकली आहेत. वाढत्या जागतिक भू-राजकीय तणावाच्या पार्श्वभूमीवर इंधन स्वयंपूर्णतेची गरज निर्विवाद असली, तरी या संक्रमणाची किंमत कोण मोजणार आणि त्यासाठी देशाची तांत्रिक तयारी कितपत आहे, याचा हा वस्तुनिष्ठ वेध.**

**मन्सूर मुल्ला,** पत्रकार, पुणे




भारतातल्या रस्त्यांवर आजघडीला २४ कोटींहून जास्त दुचाकी आणि सुमारे ४ कोटी चारचाकी चालतात. भारताची दैनंदिन इंधनाची इंधन गरज ३००० ते ४००० लाख लिटर इतकी आहे. सध्या सुरू असलेल्या अमेरिका-इस्त्राईल-इराण युद्धामुळे भारतात कच्च्या तेलाचा तुटवडा आहे. त्यामुळे पेट्रोल डिझेलच्या किंमतीमध्ये गेल्या महिन्याभरात सतत वाढ होत आहे. या गोष्टींचा विचार करून केंद्र सरकारने इथेनॉलमिश्रित पेट्रोल धोरण आक्रमकपणे लागू करण्याचं ठरवलंय. सरकारने १५ मे २०२६ रोजी या धोरणाचा पुढचा टप्पा म्हणून E30 इंधनाला मंजुरी दिली. सध्यातरी हे E30 इंधन पेट्रोल पंपावर उपलब्ध करून देण्यात आलं नाहीये, पण देशातील इंधनाचा तुटवडा पाहता हे नवं धोरण लवकरच लागू केलं जाईल अशी दाट शक्यता आहे. भारताचं E20 धोरण जाहीर झालं तेव्हाच त्यातील अनेक त्रुटी आणि समस्या समोर आल्या होत्या. आता या नव्या धोरणामुळे नव्या तांत्रिक अडचणी समोर येतायत.

### E20 धोरण काय आहे?

सोप्या भाषेत सांगायचं, तर ऐंशी टक्के शुद्ध पेट्रोलमध्ये वीस टक्के इथेनॉल मिसळलं की त्याला E20 इंधन म्हणतात. इंधनाच्या किंमती कमी करण्यासाठी, देशाचा तेलआयातीचा वाढता खर्च कमी करण्यासाठी आणि वाढतं प्रदूषण लक्षात घेऊन भारताने २०२३ मध्येच E20 धोरणाचा स्वीकार केला. १ एप्रिल २०२६ रोजी पूर्ण भारतभर E20 धोरण लागू करण्यात आलं. भारतात सध्या या धोरणानुसार पेट्रोल किंवा डिझेलमध्ये २७ टक्क्यांपर्यंत इथेनॉल मिसळण्याची

परवानगी आहे. भारताने वीस टक्के इथेनॉल मिश्रणाचं लक्ष्य २०२५ मध्येच पूर्ण केलंय. ब्युरो ऑफ इंडियन स्टँडडर्सच्या कडक नियमांनुसार, ऑइल मार्केटिंग कंपन्यां आता केवळ E20 प्रमाणित इंधनाचाच पुरवठा करतात. आज देशातल्या प्रत्येक पेट्रोल पंपावर E20 हेच मुख्य इंधन म्हणून उपलब्ध आहे. २०२३ नंतर बाजारात आलेल्या बहुतांश नवीन गाड्या या इंधनावर चालू शकतील अशा क्षमतेच्या आहेतच, पण लाखो जुन्या गाड्या आणि दुचाकीदेखील सध्या याच इंधनावर चालवल्या जात आहेत. हे इंधन जुन्या वाहनांसाठी सुरक्षित आहे असं सरकार सांगत आलंय.

### नवीन E30 मंजुरी काय आहे ?

ब्युरो ऑफ इंडियन स्टँडडर्सने १५ मे २०२६ ला E20 धोरणातील नवीन मानकं जाहीर केली. त्यानुसार, पेट्रोलमध्ये २२-३० टक्के म्हणजे E22, E25, E27, E30 पर्यंत इथेनॉल मिश्रणाला मंजुरी देण्यात आलीये. सरकारने याच्या अंमलबजावणीसाठी अजून विशिष्ट तारीख निश्चित केली नाहीये.

### E20 धोरण कशासाठी ?

भारत आपल्या एकूण गरजेच्या जवळपास ऐंशी ते पंच्याऐंशी टक्के कच्चं तेल परदेशातून आयात करतो. त्यासाठी दरवर्षी १५-१७ लाख कोटी रुपये मोजावे लागतात. हा खर्च कमी करणं हे या धोरणामागचं मुख्य उद्दीष्ट आहे. पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळल्यामुळे तेवढ्या प्रमाणावर खनिज तेलाची आयात कमी होते. दुसरी गोष्ट म्हणजे इथेनॉल हे जैविक इंधन आहे. शुद्ध पेट्रोलच्या तुलनेत इथेनॉलच्या ज्वलनातून घातक कार्बन मोनॉक्साइड आणि हायड्रोकार्बनचं उत्सर्जन कमी होतं. इथेनॉलची निर्मिती प्रामुख्याने उसाची मळी, खराब झालेलं अन्नधान्य आणि शेतातील कचऱ्यापासून केली जाते. साखर कारखान्यांना आणि शेतकऱ्यांना त्यातून एक नवा शाश्वत उत्पन्नाचा स्त्रोत मिळतो. भारतात वर्षाला जवळपास १९-२१ कोटी लिटर इतकं इथेनॉल उत्पादन होतं. त्यातील ११-१२ कोटी लिटर

## E30 साठी देश सज्ज आहे?




**E30 मुळे परकीय चलनाची प्रचंड बचत होईल, पेट्रोल-डिझेलच्या किमती नियंत्रणात ठेवता येतील. पर्यावरणाचा विचार केला तर कार्बन उत्सर्जन कमी होईल. पण या ऊर्जाक्रांतीची किंमत सर्वसामान्य नागरिकाला किंवा एकाच उद्योगाला मोजावी लागू नये, याची काळजी घेणंही तितकंच आवश्यक आहे. सद्यस्थितीत देशातील बहुतांश वाहनं आणि ग्राहक अजूनही या प्रगत इंधनासाठी तयार नाहीत. ग्राहकांचा E20 बाबतचा अविश्वास दूर करणं हे सध्या सरकारसमोरचं सर्वात मोठं आव्हान आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर सुरू असलेल्या घडामोडींमुळे देश ऊर्जासंकटाच्या उंबरठ्यावर आहे. इंधनाच्या बाबतीत स्वयंपूर्णता साध्य करणं यात काहीच गैर नाही. मात्र ही प्रक्रिया संथ, टप्प्याटप्प्याने आणि विचारपूर्वक केली जायला हवी. ऊर्जासंकट हे आव्हान आहेच, पण त्यासाठी घाईगडबडीत घेतलेले निर्णय वाहन उद्योगाला आणि सर्वसामान्यांच्या खिशाला सोसतील का याचाही सरकारला विचार करावा लागणार आहे.**




इतकं इथेनॉल सध्याचं E20 धोरण राबवण्यासाठी पुरेसं आहे. त्यामुळे भारतात सध्या इथेनॉलचं अतिरिक्त उत्पादन होताना दिसतंय.

## E20 धोरण आणि मतप्रवाह

या धोरणाच्या अंमलबजावणीवरून वेगवेगळे मतप्रवाह पाहायला मिळतात. सरकारच्या मते, E20 इंधनामुळे नवीन गाड्यांच्या मायलेजमध्ये केवळ एक ते दोन टक्के इतकीच घट होते, तर जुन्या वाहनांमध्ये हा फरक सहा टक्क्यांपर्यंत असू शकतो. इंजिनच्या क्षमतेवर याचा कोणताही नकारात्मक परिणाम होत नाही आणि त्यामुळे वाहनांची वॉरंटीदेखील रद्द होत नाही. दुसरीकडे, ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया आणि नीती आयोगाच्या संशोधन अहवालानुसार, आधुनिक इंजिन इंधनातील बदल पचवायला सक्षम आहेत, पण जुन्या वाहनांच्या बाबतीत तांत्रिक धोके नाकारता येत नाहीत.

घनतेचा विचार केला तर इथेनॉल हे पेट्रोल आणि डिझेलपेक्षा हलकं इंधन आहे. त्याची ज्वलनाची क्षमता देखील पेट्रोल-डिझेलपेक्षा कमी आहे. त्यामुळे पेट्रोल -डिझेलमधून जेवढी ऊर्जा तयार होते तेवढीच ऊर्जा तयार करायची असेल तर इथेनॉल जास्त वापरावं लागतं. शिवाय इथेनॉल हवेतील ओलावा किंवा पाणी शोषून घेतं. इथेनॉलमुळे जुन्या वाहनांच्या टाक्यांमध्ये गंज चढू शकतो, त्यातील रबरच्या नळ्या आणि प्लास्टिकचे भाग फुगून किंवा कडक होऊन खराब होऊ शकतात.

E20 धोरण जाहीर झाल्यानंतर वाहन उत्पादक कंपन्यांनी बदलत्या नियमांनुसार गाड्यांच्या इंजिनमध्ये सुधारणा केली. नवीन वाहनांमध्ये इंजिन ब्लॉक, फ्युअल इंजेक्टर्स, सील आणि वाहनाचा मेंदू समजल्या जाणाऱ्या इलेक्ट्रॉनिक कंट्रोल युनिटचं मॅपिंग बदललं गेलं. त्यानंतरही अनेक दुचाकी आणि जुन्या कार मालकांनी मायलेज अपेक्षेपेक्षा जास्त घसरल्याची आणि इंजिनच्या देखभालीचा खर्च वाढल्याची तक्रार केली.

## नव्या इंधन धोरणाचे परिणाम

सध्या रस्त्यांवर धावणाऱ्या बहुतांश गाड्या E20 इंधन 'पचवू' शकतात. पण ३० टक्के इथेनॉलचं प्रमाण जुन्या आणि सध्याच्या नव्या E20 वाहनांनाही घातक ठरू शकतं. भविष्यात E30 इंधन बाजारात आलं तर ऑटोमोबाईल क्षेत्राला गाड्यांच्या हार्डवेअर आणि सॉफ्टवेअरमध्ये नव्याने बदल करावे लागणार आहेत. काही कंपन्यांनी प्रायोगिक मॉडेल्स तयार केले आहेत, पण मुळात २० टक्के इथेनॉलमिश्रित इंधनावर चालू शकतील अशा पूर्णतः विकसित फ्लेक्स-फ्युएल गाड्याच सध्या बाजारात उपलब्ध नाहीत, तोच आता E30 चा विचार सुरू झाला आहे.

इंधन धोरणातल्या या बदलामुळे कार उत्पादक कंपन्यांना पूर्णपणे फ्लेक्स-फ्युएल तंत्रज्ञानावर आधारित गाड्या बनवण्यावर भर द्यावा लागणार आहे. त्यासाठी प्रगत सेन्सर्स, मोठ्या क्षमतेचे फ्युएल पंप आणि गंजरोधक साहित्याचा वापर करावा लागेल. नवीन तंत्रज्ञान, गाड्यांच्या इंजिनमध्ये लागणारे रबर आणि प्लास्टिकचे भाग तयार करण्यासाठी कंपन्यांना संशोधनावर खर्च करावा लागणार आहे. भारतात रबर, प्लास्टिक यांवर आधीच १८ टक्के जीएसटी लागू आहे. त्यामुळे वाहनांच्या किमती भविष्यात वाढू शकतात. E30 इंधनामुळे जुन्या वाहनांचं नुकसान होऊन वॉरंटीचे वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यासाठी जुन्या गाड्यांसाठी कंपन्यांना ट्युनिंग किंवा रेट्रोफिट किट्स उपलब्ध करून द्यावे लागतील. या किट्सचा आर्थिक भार शेवटी ग्राहकांवरच पडू शकतो. मध्यमवर्गीय दुचाकी वाहनचालकांसाठी ही खर्चिक बाब असणार आहे.

# गोड मक्याची फायदेशीर शेती




**बदलत्या कृषी पद्धतीमध्ये पारंपरिक पिकांबरोबरच नगदी आणि मूल्यवर्धित पिकांकडे शेतकऱ्यांचा कल वाढत आहे. त्यामध्ये स्वीटकॉर्न अर्थात गोड मका हे पीक अल्प कालावधीत अधिक आर्थिक परतावा देणारे म्हणून उदयास आले आहे. प्रक्रिया उद्योग, हॉटेल व्यवसाय, मॉल्स आणि शहरी बाजारपेठेत सातत्याने वाढणारी मागणी लक्षात घेता योग्य वाणांची निवड, शास्त्रशुद्ध लागवड आणि संतुलित खत व्यवस्थापन यांचा अवलंब केल्यास या पिकातून चांगले उत्पादन आणि भरघोस नफा मिळू शकतो.**

**दिलीप पार्लेकर,**
शेती अधिकारी, क्रांती कारखाना, कुंडल

### योग्य वाणांची निवड

गोड मक्याच्या लागवडीसाठी 'गोल्डन स्वीट कॉर्न' आणि 'माधुरी' हे वाण प्रामुख्याने शिफारस केले जातात. यापैकी 'माधुरी' हा वाण विशेषतः हिरव्या कणसांच्या उत्पादनासाठी लोकप्रिय मानला जातो. याशिवाय बाजारपेठेच्या गरजेनुसार विविध संकरित आणि सुधारित वाणही उपलब्ध आहेत.

### लागवडीची पद्धत

मक्याची लागवड सरी-वरंबा पद्धतीने करावी. दोन ओळींमधील अंतर ७५ सेंटीमीटर आणि दोन रोपांमधील अंतर ३० सेंटीमीटर ठेवावे. एका जागी एकच बी टोपल्यास रोपांची वाढ जोमदार होते आणि उत्पादनात वाढ होते. रोपे साधारण २० इंच उंच झाल्यानंतर एका ठिकाणी एकच निरोगी रोप ठेवावे.

### बीजप्रक्रियेचे महत्त्व

पेरणीपूर्वी बियाण्यावर बीजप्रक्रिया करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रति किलो बियाण्यास ३ ग्रॅम थायरम किंवा २ ग्रॅम बॅव्हिस्टीनची प्रक्रिया करावी. त्यानंतर पेरणीपूर्वी अर्धा ते एक तास १० किलो बियाण्यास २५० ग्रॅम अझोटोबॅक्टर आणि २५० ग्रॅम पीएसबी (फॉस्फेट विद्रावक जीवाणू) मिसळून बियाण्यांना चोळल्यास पिकाच्या सुरुवातीच्या वाढीस मदत होते.

### संतुलित खत व्यवस्थापन

पेरणीपूर्वी शेवटच्या कुळवाच्या वेळी प्रति एकर ३ ते ३.५ टन चांगले कुजलेले शेणखत जमिनीत मिसळावे. पेरणीच्या वेळी बियाण्यापासून पाच सेंटीमीटर अंतरावर आणि पाच सेंटीमीटर खोलीवर ५० किलो युरिया, १५० किलो सिंगल सुपर फॉस्फेट, ४० किलो म्युरेट ऑफ पोटॅश, १० किलो फेरस सल्फेट, १० किलो झिंक सल्फेट आणि २ किलो बोरॅक्स द्यावे. पेरणीनंतर साधारण एक महिन्याने पुन्हा ५० किलो युरियाचा पुरवठा करावा.

**स्वीटकॉर्नचे विविध वाण : स्वीटकॉर्नमध्ये साखरेचे प्रमाण नियंत्रित करणाऱ्या विविध जनुकांवर आधारित अनेक वाण विकसित केले आहेत. स्टँडर्ड स्वीट, शुगर एन्हान्स्ड, सिनर्जीस्टिक, ट्रिपल स्वीट आणि सुपर स्वीट अशा प्रकारांमध्ये हनी कॉब, गोल्डन नेक्टर, शुगर लोफ, प्लॅटिनम लेडी, सिल्व्हर प्रिन्स, मिरॅकल, रिमार्केबल, डबल ट्रिट, कँडीमॅन, अर्ली एक्स्ट्रा स्वीट, हनी सिल्क, बोन ॲपेटाइट आणि सेरेनडिपिटी या जातींचा समावेश होतो.**



**नफ्याची संधी : योग्य तंत्रज्ञानाचा अवलंब, शास्त्रशुद्ध व्यवस्थापन आणि बाजारपेठेच्या मागणीचा अभ्यास यांचा संगम साधल्यास गोड मक्याची लागवड शेतकऱ्यांसाठी चांगल्या उत्पन्नाचा पर्याय ठरू शकते. विशेषतः हिरवे कणसे, प्रक्रिया उद्योग आणि किरकोळ बाजारपेठ यांमुळे या पिकाला भविष्यात अधिक मागणी राहण्याची शक्यता आहे. नियोजनपूर्वक शेती केल्यास हे पीक निश्चितच फायदेशीर ठरू शकते.**



### तण नियंत्रण आणि पीक व्यवस्थापन

पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी खुरपणी करून शेत तणमुक्त ठेवणे आवश्यक आहे. सुरुवातीच्या काळात तणांचे नियंत्रण चांगले झाल्यास पिकाची वाढ जोमदार होते आणि उत्पादनावर सकारात्मक परिणाम दिसून येतो.

### काढणीची योग्य वेळ

पेरणीनंतर साधारण ५० ते ५५ दिवसांनी कणसे लागण्यास सुरुवात होते. स्वीटकॉर्नची पहिली काढणी साधारण ७५ दिवसांनी, तर दुसरी काढणी ९० दिवसांनी केली जाते. कणसावरील स्त्रीकेशर काळसर झाल्यावर आणि दाणे पूर्णपणे पिवळे झाल्यावर काढणी केल्यास उत्तम दर्जाचे उत्पादन मिळते.

### सुधारित जातींची माहिती

मका पिकामध्ये लवकर, मध्यम आणि उशिरा पक्व होणाऱ्या अनेक सुधारित जाती उपलब्ध आहेत. लवकर पक्व होणाऱ्या जातींमध्ये अरुण, किरण, पारस, सूर्या, पुसा लवकर, महिकांचन आणि मांजरी या संमिश्र जाती तसेच एफएच-३२११ आणि एफक्यूएच-४५६७ या संकरित जातींचा समावेश होतो. मध्यम कालावधीत पक्व होणाऱ्या जातींमध्ये नवज्योत, मांजरी, डीएमएच-१०७, केएच-९४५१ आणि एमएचएच-६९ या जातींची शिफारस केली जाते. उशिरा पक्व होणाऱ्या जातींमध्ये प्रभात, धवल, आफ्रिकन टॉल, शक्ती-१, डेक्कन-१०३, एनईसीएच-११७ आणि एचक्यूपीएम-१ या जाती लोकप्रिय आहेत.



राजकारण

# उद्ध्वस्त होणारे साम्राज्य...

**काळ कधीच एका जागी थांबत नाही. तो एका हाताने हिरावून घेतो, तर दुसऱ्या हाताने नव्याने उभं राहण्याची ताकदही देतो. वैभव, सत्ता, संपत्ती आणि माणसं यांचा गर्व एका क्षणात नाहीसा होऊ शकतो; पण संकटाच्या राखेतून पुन्हा उभं राहण्याची जिद्द जिवंत असेल, तर पराभवही नव्या विजयाची सुरुवात ठरतो. एका राजाच्या आयुष्यात घडलेल्या प्रतीकात्मक घटनेतून नशीब, काळ, विश्वासघात आणि पुनर्निर्मितीचा गूढ प्रवास उलगडून दाखवणारी ही विचारप्रवर्तक कथा.**

**दिलीप लाठी,**
संपादक, मुंबई

साम्राज्य हळूहळू उद्ध्वस्त व्हायला लागलं की त्रास होतो. जीव लावून सांभाळलेले लोक बेईमानी करायला लागले की त्रास होतो. आपलं मीठच अळणी आहे, असं कळायला लागलं की त्रास होतो. शाळेत असताना गुरुजींनी एक कहाणी सांगितली होती. ती गोष्ट ऐकल्यावर डोळ्यासमोर काही दिवस तो राजाच दिसायचा. पुढे चार पुस्तकं शिकल्यावर वाटलं, छे, असं कसं होऊ शकतं? श्रद्धा - अंधश्रद्धा... ज्याचा त्याचा प्रश्न. आपण नाही मानत हे सगळं! पण न जाणे का अचानक ती कहाणी प्रकर्षाने आठवू लागली. म्हटलं सांगावं तुम्हालाही.

आटपाट नगर होतं. तिथे एक राजा राज्य करायचा. राजा कुटुंबवत्सल. शांत शांत. आक्रमक नाही. पण प्रजेची काळजी घेणारा. जणू काही आपल्या घरातलाच एक माणूस. प्रत्येकालाच आपला वाटायचा. त्यांचा भव्यदिव्य राजवाडा. हिरे, सोनं, नाणं, पैसा, अडका, दागिने, तर होतेच. पण सगळ्यात मोठी दौलत : त्यांच्यावर प्रेम करणारी माणसं! सर्वांनाच तो राजा व त्याचा परिवार खूप आवडायचा. अतिशय सद्गुणी. सत्शील. तो होता प्रजेच्या मनातला राजा. सर्वच त्याचे गुण गायचे. आपलं नशीब चांगलं, हा आपला राजा आहे, असं म्हणायचे. त्याच्या राज्यात प्रचंड सुबत्ता. अतिशय श्रीमंत राज्य. सर्वत्र दूरवर पसरलेली समृद्धी.लोकांची नजर लागेल अशी श्रीमंती. सर्व काही आलबेल होतं.

### पहिला धक्का

पण अचानक परिस्थिती बदलली. वातावरण दूषित झालं. वारं उलटं फिरायला लागलं. राजाच्या समोर त्याच्या राजवाड्यातील दौलत हवेत उडून जाऊ लागली. त्याच्या तिजोरीतील हिरे, दागिने, सोनंनाणं त्याच्या डोळ्यासमोर राजवाड्याच्या मोठ्या खिडकीतून उडून बाहेर आकाशात दूर दूर जाऊ लागले. मग त्याच्या किचनमधील सोन्याची भांडीकुंडीसुद्धा.



त्याच्या डोक्याभोवती गोल गोल फिरून खिडकीतून उडू लागले. राजाने आपल्या जवळच्या लोकांकडे पाहिलं. त्याची माणसं त्याच्या पाया पडू लागले. आपला आदरभाव दाखवू लागले. पण हळूच त्याला सोडून जाऊ लागले. राजा खिन्न. त्याला काहीच सुचत नव्हतं. डोक्याला हात लावून तो बसला. एवढ्यात त्याच्या डोळ्यासमोर खास राजभोजनासाठी बनवलेल्या मजबूत सोन्याच्या थाळ्याही खिडकीवाटे उडून जाऊ लागल्या. त्याची आवडती खिडकी. तेथे बसून तो राजउद्यान पहायचा. तेथे बसून तो दूरचे डोंगर बघायचा. खास बनवलेले तळे बघायचा. आपण मोठ्या कष्टाने उभ्या केलेल्या या महान साम्राज्याचा अशा प्रकारे आपल्या डोळ्यासमोर नाश होत आहे, हे पाहणे त्याला सहन झाले नाही. आपला खजाना असा हवेत उडत जाताना पाहणं, त्याला सहन झाले नाही. एक प्रचंड मोठी झेप टाकून त्याने खिडकीवाटे हवेत उडून जाणारी ती सोन्याची थाळी पकडली. अनेक युद्धे सहजपणे जिंकलेल्या त्या राजाला आपण काहीतरी वाचवतो, याचं समाधान वाटलं. आपल्या हातातील मजबूत व अतिशय किमती अशा सोन्याच्या थाळीकडे तो पाहत होता. इथून पुन्हा आपल्याला सुरुवात करायची आहे, असे विचार त्याच्या डोक्यात येत होते. तेवढ्यात आश्चर्य घडले. त्याने पकडलेल्या त्याच्या हातातील थाळीचा भागच त्याच्याकडे राहिला. उरलेली थाळी सुद्धा हवेत उडून गेली. दूर आकाशात.

आता मात्र त्याला काहीच सुचत नव्हतं. आपले आपले म्हणणारे त्याचे जवळचे लोक, इतकंच नाही तर सेवक मंडळीसुद्धा त्याला सोडून जाऊ लागली. आता आपल्या नशिबात फक्त एवढीच मालमत्ता राहिली आहे, हातात असलेल्या सोन्याच्या थाळीच्या तुकड्याकडे पाहत, तो स्वतःशीच पुटपुटला. मग त्याने काही दिवस राज्य सोडून दूर निघून जायचं ठरवलं. आपली आवडती प्रजा, आपलं आवडतं राज्य, आपला आवडता राजवाडा इथले रस्ते, इथली घोडागाडी, रथ, हत्ती, सर्व काही त्यागायचे. काही दिवस. वारं परत व्यवस्थित वाहू लागेल. काळी रात्र संपेल. सूर्य उगवेल. परिस्थिती बदलेल. सर्व काही पहिल्यासारखं होईल. काही दिवसानंतर आपण परत येऊ. धोतरामध्ये तो सोन्याच्या थाळीचा तुकडा बांधला. राजाने राज्य सोडले.

काही दिवसांचा प्रवास. तो प्रवासी म्हणून एका नव्या राज्यात पोहोचला. तेथील वातावरणात प्रचंड उत्साह होता. सर्वत्र आनंद. प्रत्येक माणूस खूश. काहीतरी 'सेलिब्रेशन' सुरु होतं. सुबत्ता तर प्रचंड. 'आपण प्रवासी आहात ना? चला आमच्या सोबत. आज आमच्या राजाने सर्वांसाठी महाभोज आयोजित केला आहे. आमच्या राजाचे आणि आमच्या राज्याचे भाग्य बदलले आहे. अचानक धनलाभ झाला आहे.' त्या माणसाने सांगितल्याप्रमाणे तो राजा त्याच्या मागे मागे मुकाट्याने चालू लागला. भूकही लागली होती.

प्रचंड मोठा राजवाडा. सणासुदीचं उत्साही वातावरण.

 

## मोठा धक्का!

**'आता आपल्याला सर्वच नव्यातून निर्माण करायचे आहे. शून्यातून!' आपल्या मुठी आवळत तो उठतो. आणि एका नियोजनबद्ध प्रवासाची तयारी करतो.**

हजारो लोक मिष्टान्न खात आहेत. अतिशय भव्यदिव्य नजारा. हा राजाही जेवायच्या पंगतीमध्ये. आणि काय आश्चर्य! तेथे असलेल्या सोन्याच्या थाळ्या, सोन्याच्या ताट-वाट्या, चांदीचे पेले, सर्व काही- त्याला ओळखीचे वाटू लागले. तो परत परत पाहतो. सर्व काही त्याला ओळखीचं वाटू लागतं. आपण स्वप्नात तर नाही ना? क्षणभर त्याला वाटतं. तो स्वतःला चिमटा घेतो. पण ते खरं असतं. त्या नव्या राज्याची, त्या नव्या राजाची सुबत्ता दाखवणारी प्रत्येक वस्तू. त्याच्या ओळखीची असते. त्याच्याच राज्यातून, त्याच्याच राजवाड्यातून त्याच्या आवडत्या खिडकीतून हवेत उडून उंच आकाशात जाणारी वस्तू असते. 'हे कसं शक्य आहे?' थोडा वेळ त्याला काहीच सुचत नाही. 'बासुंदी...बासुंदी, लाडू...लाडू...' अशा वाढप्यांच्या आवाजाने तो भानावर येतो. समोर बघतो तर त्याच्या आवडीची सोन्याची थाळी! एक धक्का! 'बापरे! हे काय? कसलं माझं नशीब? हे कसं शक्य आहे?' परत पाहतो तर त्या सोन्याच्या थाळीचा काठावरचा भाग तुटलेला!

### दुसरा धक्का!

मग हळूच धोतरामध्ये कडेला गुंडाळलेला सोन्याचा तुकडा तो चाचपडू लागतो. 'कदाचित... एवढाच सोन्याचा तुकडा आपल्या नशिबात आहे. देवा तुझे आभार. काहीतरी ठेवलंय माझ्यासाठी.' तो स्वतःशीच पुटपुटतो. पण प्रचंड अस्वस्थ होतो. 'जगात काय फक्त आपल्याकडेच अशा थाळ्या असतील का? नाही मला हे पाहावेच लागेल. काय खरं काय खोटं?' त्याची जिज्ञासा चाळवते. त्याची अस्वस्थता वाढते. त्याला आता काय सत्य आहे, हे जाणून घ्यायचे असते. त्याचा अंतरात्मा त्याला शांत बसू देत नाही. धोतरात नीट गुंडाळून ठेवलेला सोन्याच्या थाळीचा तुकडा तो हळूच बाहेर काढतो. आणि आपल्या समोर असलेल्या तुटक्या थाळीला जोडून पाहतो. त्याला कसंही करून जाणून घ्यायचं असतं की येथे असलेल्या सर्व महागड्या वस्तू त्याच्याच राज्यातून आलेल्या आहेत का? आणि काय आश्चर्य! तो तुकडा अगदी त्याच थाळीचा असतो. बरोबर जुळतो.

### तिसरा धक्का!

आता त्याला काहीच खावेसे वाटत नाही. प्रचंड भूक. प्रचंड थकावट. तरीसुद्धा उरले सुरले अवसान आणून तो स्वतःला समजावण्याचा प्रयत्न करतो, 'कदाचित हा सोन्याचा एवढासा तुकडाच तुझं नशिब! आपल्याकडे काय होतं? आपण सर्व काही अशाच छोट्याशा भांडवलाने सुरु केलं होतं. करू सुरुवात पुन्हा या सोन्याच्या तुकड्याने!' असं स्वतःलाच समजावत असताना त्याला चांगलीच गती येते. थोडंसं बरं वाटू लागतं. आपण आता छानपैकी जेवण करू असं वाटतं. 'आधी तो छोटासा सोन्याचा तुकडा परत आपल्या ताब्यात घेऊ, आणि यथेच्छ जेवण करू.' असा विचार करून तो तुकडा त्या थाळीपासून काढायचा प्रयत्न करतो. आणि काय आश्चर्य! तो तुकडा त्या थाळीला चिकटतो. निघत नाही. तो तुकडा 'स्वतंत्र' होता याची कुठलीही निशाणी ठेवत नाही.

परवाची गोष्ट. ओपीडीत एक आई-बाबा आपल्या आठ वर्षांच्या मुलीला घेऊन आले. मुलीच्या एका हातात अजूनही तिची आवडती 'गोड डॉल' होती आणि दुसरीकडे आईच्या डोळ्यात पाणी. तक्रार काय? 'डॉक्टर, तिला 'पाळी' (Periods) सुरु झाली आहे.' हे वाचून तुमच्या काळजात धस्स झालं ना? मला नाही झालं. कारण आता माझ्या क्लिनिकमध्ये हे रोजचं झालंय. ज्या वयात मुलींनी दोरीच्या उड्या मारायच्या, त्या वयात त्या चिमुरड्या जीवांना सॅनिटरी पॅड्सची कटकट आणि पोटाचे क्रॅम्प्स सांभाळावे लागत आहेत. 'आई, मला रक्त का येतंय?' हा ८ वर्षांच्या मुलीचा प्रश्न ऐकून त्या मातेचं काळीज फाटलं होतं... आणि एक डॉक्टर म्हणून माझं डोकं सुन्न झालं होतं.



प्रबोधन

# दहाव्या वर्षी 'पॅड' सांभाळणारी मुलगी... ही प्रगती की अधोगती?

**डॉ. सुजित पाटील,**
बालरोगतज्ज्ञ, पुणे

हे बालपण हिरावून घेणं नाही, तर काय आहे? एक बालरोगतज्ज्ञ म्हणून मी तुम्हाला अत्यंत कडू सत्य सांगतो, जे पचवायला तुम्हाला जड जाईल: आपण आपली मुलं 'वाढवत' नाही आहोत, आपण त्यांना 'फुगवतोय'. जसं पोल्ट्री फार्ममध्ये इंजेक्शन देऊन ४० दिवसांत 'ब्रॉयलर चिकन' तयार केलं जातं, तशीच काहीशी अवस्था आज आपण आपल्या पोटच्या गोळ्याची केली आहे. ही 'वाढ' नाही, ही शरीराची 'सूज' आहे!

### याला जबाबदार कोण? आपली 'मॉडर्न' लाईफस्टाईल आणि पालकांची सोयीस्कर वृत्ती!

बघा आपण नकळत त्यांच्या आयुष्याशी कसं खेळतोय: ५०० रुपयांचा पिझ्झा की आयुष्याची होळी? विकेंडला मॉलमध्ये ५००-८०० रुपयांचा पिझ्झा/बर्गर खाताना तुम्ही फोटो काढून 'इन्स्टा'वर टाकता... 'फॅमिली टाईम!' अहो, तो 'फॅमिली टाईम' नाही, ती तुमच्या पोरांच्या आरोग्याची 'होळी' आहे! तो रबरासारखा मैदा आणि 'प्रोसेस्ड चीझ' म्हणजे हार्मोनल इम्बॅलन्सचा कारखाना आहे. शरीरात जेवढी चरबी जास्त, तेवढं 'इस्ट्रोजेन' जास्त तयार होतं. आणि हेच जास्तीचं हार्मोन त्या ८ वर्षांच्या मुलीच्या कोवळ्या मेंदूला सांगतं, 'बाळा, तुझं बालपण संपलं, आता तू बाई झालीस!'

### गरम अन्नासाठी प्लॅस्टिकचा डबा?

स्टीलचा डबा जड वाटतो आणि प्लास्टिकचा डबा फॅन्सी दिसतो, म्हणून तो मुलांच्या माथी मारताय? जेव्हा

# विचार करा पालकांनो...

**१० वर्षांनंतर जेव्हा ती तुम्हाला विचारेल: ‘आई-बाबा, तेव्हाच का नाही लक्ष दिलं? त्या पिझ्झा-बर्गरपेक्षा माझं आयुष्य महत्त्वाचं नव्हतं का?’ तेव्हा तुमच्याकडे काय उत्तर असेल?**




## सर्वात भयानक वास्तव

**या वयात पाळी सुरू झाली म्हणजे तिची हाडं लवकर जुळणार आणि उंची कायमची थांबणार. हे थांबवण्यासाठी मग उपाय काय? ‘हार्मोन सप्रेशन थेरपी!’ कल्पना करा... त्या ८ वर्षांच्या कोवळ्या फुलाला, तिची पाळी थांबवण्यासाठी पुढची ३-४ वर्षे दर महिन्याला एक वेदनादायक, जाड सुईचं इंजेक्शन घ्यावं लागणार! तुमची लाडकी लेक दर महिन्याला त्या सुईच्या भीतीनी थरथर कापणार आणि तुम्ही हतबल होऊन ते बघणार.**

## हे करा : किचनमधून ‘व्हाईट पॉयझन’ (मैदा, साखर) फेकून द्या.

- **प्लॅस्टिक ऐवजी फक्त स्टील वापरा.**
- **मुलांना ‘ब्रॉयलर’ बनवू नका: त्यांना मातीत खेळू द्या, उन्हात धावू द्या.**
- **लाड करणं म्हणजे विष खाऊ घालणं नाही, हा निष्काळीजपणा आता थांबवा!**

तुम्ही त्यात वाफाळलेली गरम भाजी टाकता, तेव्हा त्यातील ‘झिनो-इस्ट्रोजेन्स’ अन्नात उतरतात. हे रसायन शरीरात गेल्यावर ‘बहुरुपिया’ सारखं वागतं. शरीराला वाटतं हे इस्ट्रोजेनच आहे आणि शरीर अकाली वाढायला लागतं. तुमच्या ‘फॅन्सी’ सवयीने तुम्ही निसर्गाचं घड्याळच बिघडवून टाकलंय!

### दूध-चिकन की ‘हार्मोनल बॉम्ब’?

‘डॉक्टर, पोरगी खूप बारीक आहे, तिला नॉन-व्हेज देऊ का? दूध किती पाजू?’ तुम्ही तिला खायला नक्की घाला, पण बाजारातलं ते ४० दिवसात फुगलेलं ‘ब्रॉयलर’ कोंबडं आणि पिशवीतलं ‘केमिकल’ दूध देताना शंभर वेळा विचार करा.

**चिकन:** त्या कोंबडीला लवकर मोठं करण्यासाठी ‘ग्रोथ हार्मोन्स’चे हेवी डोस दिले जातात. तेच तिच्या पोटात जातात. यामुळेच आजकाल चौथीतल्या मुलींच्या ओठांवर लव (Facial Hair) येते. हे PCOD चं पहिलं लक्षण आहे!

**दूध:** गाई-म्हशींना जास्त दुधासाठी दिलेली ‘ऑक्सिटोसिन’ची इंजेक्शन्स दुधावाटे तुमच्या मुलीच्या इवल्याशा गर्भाशयाला ‘मोठं होण्याचे’ चुकीचे सिग्नल देतात. तुम्ही ‘प्रथिने’ समजून जे खाऊ घालताय, ते प्रत्यक्षात ‘हार्मोनल बॉम्ब’ आहेत!

# जनगणनेच्या रकान्याबाहेरचा भारत!

चर्चेतील मुद्दा



**घरगणनेच्या कामासाठी शिवरातल्या वस्त्यांवर फिरताना घरं मोजली, माणसं मोजली, खोल्या मोजल्या. परंतु दारिद्र्यात होरपळणाऱ्या त्या घरांतमधला अभाव, त्या चेहऱ्यांवरली चिंता आणि त्या आयुष्यांमधली असुरक्षितता याची मोजदाद करता आली नाही. कर्तव्याचा भाग म्हणून माहिती गोळा करताना आकडे मिळाले खरे; मात्र त्या आकड्यांमागे लपलेल्या वेदनांची गणना कोणत्या पद्धतीने करायची, हा प्रश्न सतत मनात घोळत राहिला. त्या दाहक वास्तवाची ही नोंद.**

**भाऊसाहेब चासकर,** सामाजिक विचारवंत व शिक्षक, अकोला

जनगणनेच्या कामानिमित्त समृद्धीने वेढलेल्या परिसरात अभाव, वंचना, उपेक्षा यांच्या वेदनेने गदगदलेल्या नदीकाठच्या वस्त्याही फिरलो. कागदावरच्या आकड्यांमध्ये माणसं आणि घरं मोजण्याचं काम होतं. पण प्रत्यक्षात वंचित समाजाच्या आयुष्यावर उमटलेल्या जखमा वाचण्याचा क्लेशकारक अनुभव मिळाला. शिवारात विखुरलेली काही झोपडीवजा घरं होती. घराला दरवाजा नव्हता. कुठे पत्रा उभा, कुठे आडवा लावलेला. आत डोकावलं की चार-सहा भांडीकुंडी, एखादी जुनी चटई, अंगावरची फाटकी-विरलेली वस्त्रं आणि तरीही जगण्यासाठी सुरू असलेली केविलवाणी धडपड दिसायची. छोट्याशा जागेत थाटलेला संसार आणि त्याहून संसारासाठी सुरू असलेला मोठा संघर्ष...

जनगणनेच्या ॲपमध्ये वेगवेगळे प्रश्न होते. घरात रेडिओ आहे का? टीव्ही आहे का? मोटरसायकल, कार, लॅपटॉप, इंटरनेट, गॅस, स्वच्छतागृह, मोबाईल? घर कोणत्या साहित्याचं बांधलं आहे? किती खोल्या आहेत? पण वस्त्यांवर फिरताना दारिद्र्याच्या गर्तेत कोसळून पडलेलं वास्तव पाहिल्यावर हे प्रश्न विचारण्याची हिंमत झाली नाही. किंबहुना गरजच वाटली नाही. ज्यांच्या घराला नीट दार नाही, ज्यांच्या पोटात दोन वेळचं पोटभर अन्न नाही, ज्यांच्या चेहऱ्यावर कुपोषणाच्या खाणाखुणा विखुरल्या आहेत, ज्यांच्या डोळ्यांत उद्याच्या दिवसाची अस्वस्थ अनिश्चितता आहे, अशा लोकांना "तुमच्याकडे लॅपटॉप आहे का?"

हा प्रश्न विचारणं म्हणजे काळानं दिलेल्या भळभळत्या जखमेवर पुन्हा डागण्या देण्यासारखं वाटत होतं. कृश शरीरयष्टी, खपाटीला गेलेली पोटं, हाडांना चिकटलेली चामडी, उन्हावाऱ्याने रापलेले चेहरे, मळकटलेले, कळकटलेले, विरलेले कपडे दारिद्र्याची व्याख्या संशोधन निबंधात लिहिलेली नसते तर अशा दुर्गम भागातल्या



- घरगणना करताना आणखी एक गोष्ट लक्षात आली. शासकीय लाभापासून आपण वंचित राहू की काय, ही भीती अनेकांच्या मनात इतकी खोलवर रुजली आहे की अनेकदा लोक खरी माहिती सांगायलाही कचरतात. खरं तर गरिबाकडे गमावण्यासारखं फारसं काही नसतं. तरीही त्याला भीती वाटते. कारण त्याच्या जगण्याला आधार देणारी एखादी योजना बंद झाली तर? ही भीती अचानक निर्माण झालेली नाही. व्यवस्थेनेच ती वर्षानुवर्षे त्याच्या मनात रुजवली आहे. ही भीतीच आपल्या समाजव्यवस्थेवरची सर्वात तीव्र, सर्वात वेदनादायी टिप्पणी आहे.

- घरोघरच्या मुलांशी संवाद साधला. दारिद्र्याचे चटके रोजच्या जगण्यात सोसणाऱ्या काही कुटुंबांतील मुलांच्या डोळ्यांत वयाला न शोभणारी उदासीनता दिसली. अपवाद वगळता नियमित शाळेत जाऊन शिकण्याची जिद्द, उमेद आणि स्वप्नं अनेक मुलांमध्ये हरवलेली जाणवली. मात्र मुली तुलनेने अधिक आत्मविश्वासाने 'आम्हाला शिकायचं आहे' असं सांगताना दिसल्या. गरिबीशी दोन हात करण्यात पालकांची सारी ऊर्जा खर्च होत असल्याने मुलांचे शिक्षण हा पालकांच्या आयुष्यातील केंद्रबिंदू न राहता अनेकदा तो दुय्यम विषय बनून जातो!

अभावग्रस्त वस्त्यांमधून चालताना ती प्रत्येक पावलावर दिसते. एका वस्तीवरून दुसऱ्या वस्तीवर जाताना मनात एकच विचार डोकावत असे की, तो म्हणजे ज्यांच्या आयुष्यात अजूनही मूलभूत गरजांचीच कमतरता आहे, ते लोक नवीन लाभ बाजूला ठेवून आधीपासून मिळणारा तुटपुंजा आधारही हातातून निसटेल की काय, या भीतीत जगताहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपल्या विकासाच्या दाव्यातील हवा काढून घेणारा हा कदाचित सर्वात काळा विनोद आहे.

एका बाजूला देश जागतिक दर्जाच्या अर्थव्यवस्थेची स्वप्नं पाहतोय. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात प्रवेश करतोय. डिजिटल क्रांतीचे गजर करतोय. आणि दुसऱ्या बाजूला अभावात दिवस कंठत असलेले काही नागरिक अजूनही शासन दरबारी आपली नोंद झाली तर मिळणारा आधार बंद होईल की काय, या भीतीत जगत आहेत.

त्या वस्त्यांतून फिरताना अनेक प्रश्न मनाला छळत राहिले. हे लोक नेमकं काय खात असतील? पिण्याच्या पाण्यासाठी नळाचं कनेक्शन नसताना कोठून पाणी वाहून आणत असतील? गॅस कनेक्शन असलं तरी सिलिंडर भरण्यासाठी पैसे नसतील तर त्याचा उपयोग काय? वादळवाऱ्यात पावसाच्या दिवसांत कच्चीबच्ची घेऊन पत्र्याच्या घरात झोपताना त्यांना सुरक्षित वाटत असेल का? उघड्यावर संडासला जाताना मनात हिंस्र श्वापदांची भीती वाटत नसेल का? हैराण करणाऱ्या तापलेल्या उन्हात पत्र्याच्या लहानशा शेडमध्ये यांचा दिवस कसा जात असेल? तापलेल्या पत्र्याखाली रात्र काढताना अंगाची लाही लाही होत नसेल का?

अभाव आणि दारिद्र्याने गांजलेल्या या लोकांना सध्या या व्यवस्थेत आवाज राहिलेला नाहीये. ते आंदोलन करत नाहीत, मोर्चे काढत नाहीत. एक्सवर 'ट्रेंड' चालवणे त्यांना माहित नाही. फेसबुकवर पोस्ट लिहून 'हॅशटॅग' चालवत नाहीत. युट्यूबवर व्हिडिओ टाकत नाहीत. या सगळ्या गोष्टींपासून ते कोसो दूर अंतरावर आहेत. ते फक्त जगत राहतात. कधी अर्धपोटी तर कधी उपाशीपोटी. उद्याची आशा बाळगत कसेबसे दिवस कंठत राहतात. दारिद्र्याने पिचलेल्या माणसांच्या करुण कहाण्या, त्यांचं जगणं, भोगणं माध्यमांतून जवळजवळ हद्दपार झाल्यात जमा आहे. माध्यमांचा इंडिया आणि गरिबांचा भारत वेगळा आहे. जनगणनेच्या फॉर्ममध्ये घराची माहिती भरली गेली. भौतिक सुविधा नोंदवल्या गेल्यात. परंतु अभाव कुठे कसा नोंदवायचा? कोणता की बोर्ड वापरून असुरक्षितता कुठे कशी नोंदवायची? हतबलता कोणत्या लिपीत लिहायची? कोणत्या रकान्यात अगतिकता भरायची? वर्षानुवर्षे न बोलता सहन केलेल्या वेदनांची नोंद कोणत्या चौकटीत कशी करायची? हे सगळे प्रश्न मात्र अनुत्तरित आहेत. कालही होते आणि आजही आहेत.

# परसबागेत भाजीपाल्याचे 'रोटेशन' अपरिहार्य!

शेती-माती



**घरासाठी भाजीपाला उगवायचा असेल तर सर्वात आधी एक गोष्ट समजून घ्यावी लागते. घरगुती भाजीपाला शेतीमध्ये मोठे उत्पादन महत्त्वाचे नसते. सातत्य महत्त्वाचे असते.**

**प्रतापसिंह मोहिते-पाटील,** सांगली

आज मेथी आली, उद्या भेंडी मिळाली, परवा काकडी मिळाली, आठवड्याला थोडे टोमॅटो, थोडी मिरची, थोडी वांगी, थोडी कोथिंबीर मिळत राहिली तरच टेरेस गार्डन किंवा परसबाग यशस्वी म्हणायची. बहुतेक लोक सगळे एकदम लावतात. मग एकदमच भरपूर भाजी येते आणि दोन महिन्यांनी काहीच राहत नाही. म्हणून घरगुती भाजीपाला शेतीमध्ये सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे रोटेशन.एक पीक सुरू असताना दुसरे वाढत असले पाहिजे आणि तिसरे रोपवाटिकेत तयार असले पाहिजे.

सगळ्यात आधी एक गोष्ट लक्षात घ्या. खाली दिलेले दिवस, उत्पादन, कालावधी हे ठोकताळे आहेत. बियाण्याची जात, उन्हाळा-पावसाळा-हिवाळा, पाणी, माती, कुंडीचा आकार, खत व्यवस्थापन, उन्हाचे तास यावर सगळे बदलू शकते. पण साधारण प्लॅनिंग करण्यासाठी हे गणित उपयोगी पडते. टोमॅटो साधारण लागवडीनंतर ६० ते ७५ दिवसांनी सुरू होतो. त्यानंतर २ ते ३ महिने जोरात उत्पादन देतो. योग्य काळजी घेतली तर ५ ते ६ महिने झाड चालते. एक झाड साधारण ४ ते ८ किलो उत्पादन देऊ शकते. घरासाठी ६ ते १० झाडे पुरेशी असतात. पण ती एकदम लावू नयेत. साधारण दर २० ते २५ दिवसांनी नवीन २ ते ३ रोपे लावत राहावीत.मिरची साधारण ७० ते ९० दिवसांनी सुरू होते. पण एकदा चालू झाली की ६ ते ८ महिने सतत मिरच्या देते. एक झाडातून २ ते ५ किलो उत्पादन मिळू शकते. घरासाठी ४ ते ६ झाडे पुरतात. दर २ ते ३ महिन्यांनी नवीन रोपे तयार ठेवली तर सातत्य टिकते.

वांगी हे लोक समजतात त्यापेक्षा संथ पीक आहे. वांग्याला व्यवस्थित उत्पादन सुरू व्हायला साधारण ९० ते १२० दिवस लागू शकतात. त्यानंतर ४ ते ६ महिने उत्पादन मिळते. एक झाड ३ ते ६ किलो सहज देते. घरासाठी ३ ते ४ झाडे पुरतात. पण दर ४५ ते ६० दिवसांनी नवीन रोपे लावत राहणे जास्त योग्य. भरीताची वांगी अजून संथ असतात. पण एक फळ मोठे असल्यामुळे कमी झाडे पुरतात. १ ते २ झाडे घरासाठी भरपूर असतात.भेंडी ४५ ते ५० दिवसांत सुरू होते. त्यानंतर साधारण ५० ते ७० दिवस जोरात भेंडी देते. मग झाड कठीण होते आणि उत्पादन कमी होते. म्हणून भेंडी एकदम जास्त लावू नये. दर १५ ते २० दिवसांनी नवीन ४ ते ५ झाडे लावत राहणे जास्त योग्य. घरासाठी १० ते १२ झाडे पुरतात. गवार ४५ ते ५५ दिवसांनी सुरू होते आणि साधारण ४० ते ६० दिवस शेंगा देते. चवळी ५० ते ६० दिवसांनी सुरू होते आणि २ महिने चालते. ही दोन्ही पिके दर महिन्याला थोडी थोडी लावत राहिली तर सतत शेंगा मिळतात. वाल थोडा संथ आहे. ७० ते ९० दिवसांनी सुरू होतो. पण त्यानंतर अनेक महिने शेंगा देतो. एक किंवा दोन वेली घरासाठी पुरतात.




# IBPS जिंकायची असेल तर 'लॉजिक' शिका!

**"मी IBPS ची परीक्षा पास होऊ शकतो का?" हा प्रश्न दिसायला साधा आहे, पण खरं सांगायचं तर याचे उत्तर अवघड आहे. कारण या एका प्रश्नाचे उत्तर पुढील गोष्टीवर अवलंबून आहे, तुमची गणित, English या विषयांचे ज्ञान, तुमची मानसिकता, तुमचं धैर्य आणि तुमची तयारी करण्याची क्षमता.**

**दत्तात्रय कोळी,**
करिअर मार्गदर्शक, इचलकरंजी




IBPS साठी पात्रता काय? तर कोणतीही पदवी. म्हणजे कुणीही फॉर्म भरू शकतो. पण सगळे पास होतात का? नाही. कारण ही परीक्षा फक्त "तुम्ही किती अभ्यास केला" हे बघत नाही, तर "तुम्ही किती वेगाने आणि अचूक विचार करू शकता" हे तपासते. इथे पाठांतर चालत नाही, इथे आकलन क्षमता व स्ट्राँग लॉजिक लागत. अनेकांना वाटतं, बँकेची परीक्षा म्हणजे अकाउंटिंग येणार आणि B.Com वाले सहज पास होतील. हा गैरसमज आहे. प्रिलिम्समध्ये एकही प्रश्न बँकिंग किंवा अकाउंटिंगचा नसतो, आणि मुख्य परीक्षेतही फारसा संबंध नसतो. इथे विषय असतात - Quantitative Aptitude, Reasoning Ability आणि English. आणि इथेच इंजिनिअरिंगचे विद्यार्थी सुरुवातीपासून पुढे दिसतात. कारण त्यांचा पाया आधीच मजबूत असतो. ११वीपासून Maths, तेही इंग्रजीतून त्यामुळे प्रश्न समजायला वेळ लागत नाही. Reasoning त्यांच्यासाठी नवीन नसतं; लॉजिक लावणं, पॅटर्न ओळखणं हे त्यांचं रोजचं काम असतं.

इंजिनिअरिंगमध्ये जाडजूड पुस्तक असतं, पण वेळ कमी असतो, त्यामुळे ते योग्य मुद्यावर अभ्यास करतात. हीच सवय त्यांना IBPS मध्ये फ्रंटला ठेवते. त्यातच कमी वेळेत जास्त अभ्यास करण्याची कला, प्रेशरमध्ये शांत राहण्याची क्षमता आणि रात्रभर जागून काम पूर्ण करण्याची सवय हे सगळं चार वर्षांत ते शिकलेले अनुभवलेलं असतं. आणि सर्वात महत्वाचं म्हणजे ते या परीक्षेकडे "परीक्षा" म्हणून बघत नाहीत, तर "प्रोजेक्ट" म्हणून घेतात. आता B.Com, B.Sc आणि BA विद्यार्थ्यांची विषयी . B.Com विद्यार्थ्यांना वाटतं, "आपल्याला बँकिंग येतं, आपल्याला फायदा होईल," पण प्रत्यक्षात परीक्षेत त्याचा उपयोग होतं नाही. B.Sc विद्यार्थ्यांना इंग्रजीचा थोडा आधार मिळतो, पण बाकी सगळं नव्याने शिकावं लागतं. आणि BA विद्यार्थ्यांची स्थिती तर अजून वेगळी. मी स्वतः BA चा विद्यार्थी. आमची सवय म्हणजे एका ओळीच्या प्रश्नाचं उत्तर ४-५ पानं लिहायचं. पण इथे? ३० सेकंदात उत्तर काढायचं असतं. ११ वी पासून गणित दूर गेलेलं, Reasoning म्हणजे काय हेही माहित नसलेलं, इंग्रजी थोडंफार येतं पण आत्मविश्वास कमी.पण हे सगळं असूनही मी IBPS ची ऑफिसर लेव्हल परीक्षा पास केली आणि आज LIC मध्ये Class 2 Officer म्हणून काम करतो.

# ग्राफिक्स


फक्त 9.5%
भारतीय करतात
शेअर मार्केटमध्ये
गुंतवणूक!
62%
49%
33%
21%
15.2%
13%
9.5%
अमेरिका
कॅनडा
युनायटेड किंगडम
रशिया
जपान
चीन
भारत


लष्करी खर्चात भारत
जगात ५ व्या स्थानी!
युएसए
$954 अब्ज
चीन
$336 अब्ज
रशिया
$190 अब्ज
जर्मनी
$114 अब्ज
भारत
$92 अब्ज
2
3
4
5


Anthropic ची गरुडझेप
व्हॅल्युएशनमध्ये जागतिक दिग्गजांना
टाकले मागे!
ANTHROPIC
$965B
Walmart
$911.9B
OpenAI
$852B
JPMorgan Chase & Co.
$794.6B
ORACLE
$657B
VISA
$583B
intel
$458B
mastercard
$415B
NETFLIX
$297B
Coca-Cola
$275B
सोर्स: Companiesmarketcap.com


जगातले पहिले ट्रिलेनियर
एलॉन मस्क
लॅरी पेज
$292.7 अब्ज
सर्गेई ब्रिन
$270 अब्ज
जेफ बेझोस
$251.5 अब्ज
लॅरी एलिसन
$230.1 अब्ज
मायकल डेल
$224.4 अब्ज
मार्क झुकरबर्ग
$195.3 अब्ज
जेनसेन हुआंग
$177.1 अब्ज
बर्नार्ड आर्नॉल्ट
$158.7 अब्ज
जिम वॉल्टन
$144.2 अब्ज
एलॉन मस्क
$1 ट्रिलियन


बक्षीस रकमेची तुलना
FIFA विश्वचषक 2026 विरुद्ध ICC स्पर्धा
FIFA विश्वचषक 2026
2026
विजेता
₹475 कोटी
उपविजेता
₹313.5 कोटी
फुटबॉल
ICC पुरुष एकदिवसीय (ODI)
2023
विजेता
₹38 कोटी
उपविजेता
₹19 कोटी
एकदिवसीय क्रिकेट
ICC पुरुष टी-20 विश्वचषक
2026
विजेता
₹23.28 कोटी
(अंदाजे)
टी-20 क्रिकेट


UPI ॲप्समध्ये दादा कोण?
ॲप्स मार्केट शेअर
पे
46.2%
32.7%
paytm
7.9%
navi
3.6%
1.8%
BHIM
0.98%
0.85%
CRED
0.68%
Pay
0.65%
amazon pay
0.38 %
*मे 2026 अखेरीसची आकडेवारी


भारतीयांचे सर्वात आवडते
आईसक्रीम ब्रँड्स
(मार्केट शेअरनुसार)
1 अमूल
43.2%
Amul
VANILLA ROYALE
2 क्वालिटी वॉल्स
14.8%
3 वाडीलाल
11.6%
4 मदर डेअरी
6.9%
5 हॅवमोर
5.8%
6 क्रीमबेल
5.1%
7 अरुण आईस्क्रीम्स
3.9%
8 नॅचरल्स
2.7%
9 बास्किन रॉबिन्स
1.9%
10 दिनशॉज
1.4%


भारतातील
सर्वाधिक विकल्या जाणाऱ्या
लक्झरी कार्स (2025)
(विकल्या गेलेल्या युनिट्सची संख्या)
1 मर्सिडीज ई-क्लास 4,117
2 मर्सिडीज जीएलई 2,900
3 बीएमडब्ल्यू आयएक्स1 2,786
4 बीएमडब्ल्यू एक्स1 2,734
5 मर्सिडीज जीएलएस 2,645
6 मर्सिडीज जीएलसी 2,631
7 बीएमडब्ल्यू 5 सिरीज 2,534
8 लँड रोव्हर डिफेंडर 2,470
9 बीएमडब्ल्यू 3 सिरीज 2,328
10 बीवायडी सीलायन 7 2,213
सोर्स: Rushlane

# व्यवस्थेच्या कानाखाली आवाज काढणारं 'बाभूळकांड'

**समाजात सध्या टीकात्मक, तुलनात्मक आणि आत्ममग्न लिखाणाचा जोरदार धुडगूस सुरू आहे. पण समाजमनाला पचेल, रूचेल, भावेल अशा भाषेतील परिवर्तनशील लिखाण अगदी वाळवंटातील ओयासिससारखं झालंय. बोटावर मोजता येतील एवढ्याच लेखणीत हे खमकं कोवळेपण उरलंय. बाकी बहुतेक लेखण्या टिंगल-टवाळीचा, विखारी वा विद्रोहाचा सूर लावतात आणि यामुळेच सामाजिक आरोग्य धोक्यात आलं आहे. आज या धगधगत्या सामाजिक पटलावर अशाच एका गर्दहिरव्या ओयासिसनं गारूड घातलंय. त्याचं नाव म्हणजे ऐश्वर्य पाटेकर होय.**

**समीक्षा :** साहित्यिक अनंत कराड, अध्यक्ष, एकता फाउंडेशन व संचालक, मराठवाडा साहित्य परिषद, संभाजीनगर.

साहित्य




ऐश्वर्य यांची लेखणी खरोखरच ऐश्वर्यसंपन्न म्हणावी लागेल. त्यांच्या 'जू' या आत्मकथनानं अवघ्या मराठी रसिकमनावर जी मोहिनी घातली, त्या प्रभावातून वाचक अजून बाहेर पडलेला नाही, तोवर त्यांचा 'बाभूळकांड' नावाचा कथासंग्रह रसिकांवर भुरळ घालतोय. हा कथासंग्रह वाचताना स्वतःशीच गप्पा मारता मारता हा माणूस वाचकालाही आपल्या गप्पांमध्ये कधी अन् कसा सामिल करून घेतो ते  कळत नाही; हे विशेष. अंगठ्याच्या ठशापासून सुरू झालेलं हे कांड नदीच्या ओघवत्या प्रवाहाप्रमाणं स्वप्नविक्याापाशी अगदी सहजी येऊन थांबतं. लहान मुलांना शाईच्या पॅडचं भलतं वेड. त्यात ते पॅडच जर त्याच्या हाती लागलं तर काय होऊ शकतं याचं स्वगत म्हणजे 'अंगठ्याचा ठसा'.

ते पॅड मिळवण्यासाठी लेखकानं लहानपणी भरसक प्रयत्न केले. पण त्यात त्याला यश आलं नाही. शेवटी रेशनदुकानाच्या कोपऱ्यावर शाई संपलेलं पॅड त्याला सापडतं अन् जगातील सर्वात मोठी दौलत सापडल्याप्रमाणं तो हरकून जातो. या ठशाच्या कथेत लपलेली सावजीची कथा वाचून तर मन सुन्न होऊन जातं. पॅड ही बाब अतिशय किरकोळ असली तरी त्यावर धबधब्यागत कोसळती कथा लिहून ती वाचताना वाचकाचं लक्ष जराही इकडे तिकडे जाणार नाही याची उत्तम खबरदारी घेणं ही गोष्ट वाटते तेवढी साधी नाही.

'सुक्याची गाय' ही अशीच एक भन्नाट कथा. दत्तू कानूल्या, इबलीश पिऱ्या ही त्यातील पात्र ठळकपणे लक्षात राहतात. सुक्याचा गाईमध्ये प्रचंड जीव असतो. ती गाय चोरीला गेल्यावर सुक्याला वेड लागतं व शेवटी तो गाईप्रमाणेच परागंदा होतो. असा या कथेचा हृदयद्रावक अंत आहे जो वाचकाच्या मनाला चटका लावून जातो.

त्यापुढील ‘रघू मोर्चात मेला’ ही कथा व्यवस्थेची लक्तरे वेशीवर टांगणारी आहे. बिनअकली नेत्यांच्या नादी लागून गोरगरीबांच्या कुटूंबांची कशी वाताहत होते याची जळजळीत कहाणी म्हणजे ही कथा होय. आपल्या अडाणी आईइतकी जरी अक्कल रघूला असती तरी तो व्यवस्थेचा बळी ठरला नसता हेच या कथेतून लेखक सुचवतोय.

पुर्वजांवर झालेल्या अन्यायाविरुद्ध एक चिमणीचं पिलू पेटून उठतं अन् हळूहळू आपल्या समाजालाही जागं करतं. एवढंच नाहीतर समाजबांधवांची एकी करून ते ‘बाभूळकांड’ घडवून आणणाऱ्यांबरोबर युद्ध सुद्धा करतं व त्यात त्यांचा विजय होतो. जागतिकीकरणाने माणसाची बुद्धी सडवली, मती चळवली आणि तो फक्त स्वार्थी बनला. एखाद्याची मर्यादा हेरून वार करायला तो पटाईत झालाय. वाईट वागलेल्यांच्या कृत्याचं समर्थन करण्यासाठी त्याच्या जातीपातीतली माणसं त्याच्याबरोबर उभी राहतात. ही धोक्याची घंटा लेखक या कथेतून घणाघणा वाजवतोय. पण त्याचा गेंड्याची कातडी पांघरलेल्या माणसांवर कितपत परिणाम होईल ते येणारा काळच सांगेल.

गावाकडचा अडाणी बाप बापजाद्यांचा जमीनजुमला विकून पोराला इंजिनिअर करतो आणि भविष्यात तोच दिवटा आईबापाला विसरून जाऊन कायमस्वरूपी परदेशातच स्थाईक होतो. हा धक्का सहन न झाल्यानं त्या भोळ्या बापाला वेड लागतं. अशा आशयाची कथा म्हणजे ‘शिळ्या भाकरीचं विमान’ ! तसं पाहिलं तर या कथेत दोन कथा दडलेल्या आहेत पहिली कथा म्हणजे आईबद्दल, गावमातीबद्दल अपार प्रेम असणारा गौतम नोकरी लागल्यावर आईला शहरात रहायला येण्यासाठी आग्रह करतो. पण आई त्याच्या हट्टाला जुमानत नाही. कारण तिचा जीव शेतीमातीतून निघायला तयार नाही. म्हणून गौतम दर आठ पंधरा दिवसाला गावाकडे मुद्दामहून चक्कर मारतो व आईची, थोरला भाऊ आणि वहिनीची शक्य तितकी काळजी घेत असतो.

शेवटी त्याची आई सुखासमाधानाने गावपांढरीतच अंतिम श्वास घेते. आपल्या आईची आपण हवीतशी सेवा करू शकलो नाहीत याची गौतमाला खंत लागून राहते. आणि दुसरी कथा म्हणजे जिचा वर उल्लेख केलेला आहे. ‘वाटणी’ कथेतही लहानपणी आई-वडीलांवर प्रचंड प्रेम करणारे पोरं शिकून मोठे झाल्यावर कसे बदलतात याची मन सुन्न करणारी कहाणी आहे. समाजातील वडीलधाऱ्यांच्या बाबतीत जागोजागी आढळणारे जळजळीत वास्तव या कथांतून लेखक वाचकांसमोर ठेवतो.

## ‘दगडाचं उसं’

**समाजातील विषमतेचं भयावह वास्तव चित्रित करण्यात पाटेकरांची लेखणी यशस्वी झालीय हे सांगताना उर जरी अभिमानानं भरून येत असला तरी मुर्दाड माणसांच्या वस्तीत आपण डोळ्यावर स्वार्थाचं कातडं ओढून जगतोय या जाणिवेतून मान शरमेनं खाली जाते. माणूस सवयीचा गुलाम असतो पण त्यानं ठरवलं तर तो ब्रम्हांड हलवू शकतो अशी शिकवण देणारी बाभूळकांडातील ‘संतुकची गोष्ट’ प्रेरणादायी आहे. तर वाचकांच्या मनाला विरंगुळा देणारी‘दत्तोबाचा घोडा’ कथा परिकथेतल्या अंगानं जाणारी आहे भावाभावांच्या नात्यात वितुष्ट आणू पाहणारी सुनंदा, पण तिच्या कटकारस्थानांना वेळोवेळी हाणून पाडणारा तिचा नवरा सावजी हा शेवटी शेतकऱ्याच्या मरणकहाणीचा फास आपल्या भावाच्या गळ्यातून काढू शकत नाही ! काळजाला घरं पाडणारी ही गोष्ट म्हणजे ‘दगडाचं उसं’ होय.**

अलकीच्या आजीच्या आरशाची गोष्टही तशी मोठी मजेशीर आहे. तिच्याकडील आरशानं ती लोकांना मदत करायची, पण ती करण्यापूर्वी समोरच्या व्यक्तीला एखादं व्यसन असलं, घरातील माणसांबरोबर त्याचं पटत नसलं किंवा त्याच्याकडे काही उणीव असेल तर आजी त्याला ती कमतरता, व्यसन सोडायला लावी. यामुळं सारं गाव गुण्यागोविंदानं नांदत होतं. जादूच्या आरशाबद्दल तिने समाजात कसलीही अंधश्रद्धा पसरवली नाही तर गावातील एकोपा टिकवण्यावर भर दिला.

थोडक्यात काय तर जादू आरशात नाही तर अलकीच्या आजीत होती. आपल्याला पडलेल्या स्वप्नाचं गोष्टीत रूपांतर कसं करावं हे शिकायचं असेल तर ‘अलकीच्या आजीचा आरसा’ ही कथा आवर्जून वाचावी. सुली अन् रूख्मी या दोन जीवलग मैत्रीणींच्या जीवनाची चितरकथा ‘लाल पाणी’ मधून वाचायला भेटते. शाळा असो, रानातली

कामं असो की पाणवठ्यावर जाणं असो दोघी सोबतच असणार. रूख्मीचं लग्न जमल्यावर गावातील आयाबाया सुलीला हटकून डिवचायच्या. पण एकदिवस दोघी विहिरीवर पाणी आणण्यासाठी गेल्या असता गर्दीत कुणाचातरी धक्का लागून रूख्मी विहीरीत पडते अन् त्यातच तिचा अंत होतो. हा धक्का सुली सहन करू शकत नाही. तिला वेड लागतं आणि तिही एकदिवस मग त्याच विहिरीत जीव देते. अशी वेदनादायक कहाणी पाटेकरांनी या कथेत उत्तमरित्या रंगवली आहे.

व्यवस्था सामान्य माणसाला कित्येक गोष्टींत अनभिज्ञ ठेवूनच वार करते. हे पाटेकरांचे विधान कटू असले तरी सत्य आहे. गावशिवारातील प्रकल्पासाठी तात्या सोडून जवळपास सर्वच शेतकऱ्यांनी काळ्याईचा सौदा केला. शेवटी एजंटाने तात्याला फसवून त्याचीही जमीन हडपली. याचीच कोर्टात दादा मागणाऱ्या तात्याला वकिलानेही लुबाडलं. बापाला हुंड्याचं ओझं नको म्हणून पोरीनं आत्महत्या केली. शाळा शिकून इंजीनियर होण्याचं स्वप्न पाहणारा पोरगा गवंड्याच्या हाताखाली मजुरी करू लागला.

एवढं सगळं झाल्यावर वकिलाची फिस द्यायला 'खिशात कौडी शिल्लक नाही, विकायलाही काहीच उरलं नाही !' असं सांगणाऱ्या मजबूर तात्याला तो नराधम वकिल 'मग स्वतःची हाडं विक' असा बेशरमीचा सल्ला देतो. वकिलाचा सल्ल्याला जग प्रमाण मानतं म्हणून तात्या खरोखरच बाजारात आपली हाडं विकायला बसतो. अशी दर्दनाक कहाणी लेखक 'तात्याची हाडं' कथेतून मांडतो ती वाचताना मन सुन्न होऊन जातं.

समाजाकडे एक तराजू आहे. त्यात शहाणे अन् वेडे तोलले जातात. एखाद्याने एखाद्या गोष्टीचा ध्यास घेतला की त्याचं वेड समजून घेण्याऐवजी त्याला वेडा ठरवून समाज मोकळा होतो. कुणाच्याही अगदी फुटकळ आनंदात सहभागी होत 'गुलाल' उधळण्याऱ्या भरत्याची कहाणी जणू निस्वार्थी आनंदाचं झाडंच आहे. पावलागणिक स्वार्थ जपणाऱ्यांच्या जगात भरत्या खरोखरच निखळ, निर्मळ, निर्भेळ सुख उपभोगतो हे 'गुलाल' कथेतील एक नवलंच.

कास्तकारांच्या भुकेला दुष्काळाचं ग्रहण लागलं नाही तर नवलंच. अशाच भयाण दुष्काळाची कहाणी 'बिघाभर बाप' कथेत पाटेकरांनी दादांच्या जीवापल्याड जपलेल्या दोन शेर बियाण्यासारखी पानभर पेरलीय. ती प्रत्यक्ष वाचण्याचं व त्याचबरोबरच माणुसपण वाचवण्याचं मी वाचकाला आवाहन करतो. तशीच कथा बियावाल्या बाईची. 'गुलाल' मधला भरत्या, 'बिघाभर बाप' मधले दादा आणि ही 'बियावाली बाई' माझ्या दृष्टीनं एकाच जातकुळीतले ! नवनाथ या परिस्थितीने गांजलेल्या युवकावर त्याची बायको सगुणाच्या अकाली जाण्यानं अन् तिचा मृतदेह गावी न्यायला ॲब्युलंससाठीही जवळ एक पैसाही नसल्यानं तिच्या मृतदेहाचं गाठोडं खांद्यावर घेऊन २५ कि. मी.पायी चालण्याची वेळ येते, ही ऐश्वर्य यांची 'मरणूक' कथा वाचकाला अंतर्बाह्य हलवून सोडते.

**स्वप्नविक्या :** अस्मानी अन् सुलतानीच्या कचाट्यात सापडणारा शेतकरी. अस्मानी संकट तर कधीकधीच पण, सुलतानीची मुस्कटदाबी सदाचीच. ही व्यवस्था शेतकऱ्याला उजरूही देत नाही आणि मग बिचारा 'साहेबराव करपे' मरणाला जवळ करतो. शेतकऱ्याची पहिली आत्महत्या म्हणून सरकारदप्तरी नोंदही होते. आपल्या जाण्यानं मागच्या शेतकरी जमातीचं भलं व्हावं म्हणून तो बायको पोरांसकट आत्महत्या करतो, पण व्यवस्था ढिम्म ! शेतकरी आत्महत्या या दुखऱ्या नसेवर बोट ठेवणाऱ्या 'साहेबराव करपे' कथेचा आताच्या व्यवस्थेवर थोडाफार परिणाम झाला तरी 'स्वप्नविक्या' ऐश्वर्य यांच्या कथालेखनाचं सार्थक झालं असं म्हणता येईल. पाटेकर म्हणजे सदाहरित माणूस. ज्याला पाहिलं की प्रत्येकाच्या मनाची फांदी हिरवी होते. मधासारखा मधूर, फुलासारखा सुगंधी, दुधासारखा शुभ्र, पाण्यासारखा नितळ, हवेसारखा प्रवाही, समईच्या ज्योतीसारखा सात्विक आणि काचेसारखा पारदर्शी अशा अनेकविध अभुषणांनी नटलेल्या पाटेकरांचं हेच तर खरं ऐश्वर्य आहे.

**पुस्तक – बाभूळकांड (कथासंग्रह)**
**लेखक – ऐश्वर्य पाटेकर**
**प्रकाशन – लोकवाङ्मय गृह, प्रभादेवी**
**मुखपृष्ठ – सरदार जाधव**
**पृष्ठ – १७२ मूल्य – २५०/-**




# बिभत्स कंटेंट आणि आपण

**कुठल्याशा स्टँडअप कॉमेडियनच्या चॅनलवरच्या अत्यंत बिभत्स कंटेंटविषयी सध्या जोरदार चर्चा सुरु आहे. पब्लिक फोरमवर कोणी इतकं घाण, अश्लील, अश्लाघ्य, बिभत्स कसं बोलू शकतं याचा सगळ्यांना जोरदार धक्का बसला आहे. 'कारवाई करा', 'बंदी घाला' अशा जोरदार मागण्या सुरू आहेत.**

**प्रसाद शिरगावकर,** कंटेंट क्रिएटर, पुणे

खरंतर हा कोण तथाकथित कॉमेडियन आहे त्याचं नावही मला आजपर्यंत माहित नव्हतं. त्याचा काही चॅनल वगैरे आहे आणि तो लोक बघतात हेही माहित नव्हतं. ही controversy सोशल मीडियातून समजल्यानंतर मी त्याचं नाव आणि त्याचा चॅनल शोधायचा काहीही प्रयत्न केला नाही. करणारही नाही. (अमुक ठिकाणी उकिरडा आहे असं कोणी सांगितल्यावर तो हुडकत जाऊन हुंगत बसायचा नसतो हे माझं बेसिक तत्व आहे.)

अलिकडे स्टँडअप कॉमेडीच्या नावाखाली अश्लाघ्य आणि बिभत्स कंटेंटचे हे असंख्य उकिरडे सोशल मीडियावर तयार केले जात आहेत. घाणातला घाण उकिरडा निर्माण करून तो हुंगत येणाऱ्या लाखो लोकांमुळे आपण रातोरात प्रसिद्ध व्हावं अशी एक रसातळाला नेणारी अजब स्पर्धा सध्या सुरू आहे. शून्य कलात्मलकता, सर्जनशीलता आणि विनोदबुद्धी असलेले, अत्यंत सामान्य वकूबाचे तथाकथित कंटेंट क्रिएटर्स आणि स्वघोषित इन्फ्लुएन्सर्स ह्या रसातळाला नेणाऱ्या उकिरडा स्पर्धेत हिरिरिने भाग घेत आहेत.

आपण जे काही अश्लील, अश्लाघ्य, बिभत्स करून टाकू त्याला किती लाईक्स, किती कमेंटस, किती फॉलोवर्स हे मोजत बसणं हेच त्यांचं उद्दिष्ट असतं. शिव्या द्यायच्या तर शिव्या द्या, पण एक दहा वीस हजार शिव्या आल्या की त्यांना बरं वाटतं! मग ह्यावर बंदी घालावी का सरकारने? तर अवश्य घालावी. पण त्याने काही फरक पडणार नाही. सेन्सॉरशिप/बंदी ह्या सध्याच्या डिजिटल युगात कालबाह्य झालेल्या उपाययोजना आहेत. एका चॅनलवर बंदी घातली तर निर्माते ल काढू शकतात. एका माध्यमावर बंदी घातली तर दुसरं माध्यम शोधू शकतात. आणि असा कंटेंट आवडीने बघणारेही तो जेन केन प्रकारेण मिळवून बघू शकतातच.

मग ह्यावरचा उपाय काय? तर, आपल्याला बिभत्स रस आवडत नसेल, त्या रसात तयार केलेला अश्लाघ्य कंटेंट आवडत नसेल तर तो आपण अजिबात न बघणं हा पहिला सर्वोत्तम उपाय आहे. जगात असंख्य उकिरडे असतील, पण मी ते शोधत जाणार नाही, कोणी सांगितलं तरी ते हुडकणार नाही हा पहिला उपाय. दुसरा म्हणजे, उकिरड्यावर टिका करायच्या निमित्तानेही त्या उकिरड्याचा पत्ता दुसऱ्या कोणाला सांगायचा नाही. उकिरड्याबद्दल काय बोलायचं ते बोला, काय टीका करायची ती करा. पण उकिरड्याचा पत्ता दुसऱ्या कोणाला देऊ नका. त्याने तो पसरणार नाही आणि व्हायरल होणार नाही. प्रसिद्धीसाठी बिभत्सरसात अत्यंत भीषण कंटेंटचे उकिरडे निर्माण करणे ही सध्याची फॅशन झाली आहे. मात्र अशा उकिरड्यांकडे ढुंकूनही न फिरकणं आणि त्यांना अनुल्लेखाने मारणं ह्यानेच हे उकिरडे कमी होण्याची शक्यता आहे. हे होतील न होतील, किमान आपण स्वतः बिभत्स रस सोडून इतर रसांच्या ताटव्यांमध्ये रमू शकलो तर उत्तम!!

# मला रीलस्टार व्हायचंय..!




**पूर्वी डॉक्टर, अभियंता, शिक्षक किंवा प्रशासकीय अधिकारी होण्याची स्वप्ने पाहणारी तरुणाई आता सोशल मीडियावरील प्रसिद्धीलाच यशाचे मापदंड समजू लागली आहे. रील्स, व्ह्यूज, लाईक्स आणि फॉलोअर्सच्या आभासी जगात अनेक विद्यार्थ्यांची ध्येये आणि वास्तव यांच्यातील अंतर वाढताना दिसत आहे. या बदलत्या मानसिकतेचे मानसशास्त्रीय विश्लेषण करताना योग्य दिशा आणि समतोल साधण्याचा संदेश देणारा हा विचारप्रवर्तक लेख**


**डॉ. स्वाती गानू,** मानसोपचार तज्ज्ञ, मुंबई


अलीकडे विद्यार्थी करिअर कौन्सिलिंगसाठी येतात, तेव्हा त्यांना स्वाभाविकपणे विचारला जाणारा प्रश्न असतो – 'मोठेपणी काय बनायचं आहे?' पूर्वीची उत्तरं असायची – डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक, पोलीस अधिकारी किंवा उद्योजक. पण आता काही विद्यार्थ्यांकडून वेगळीच उत्तरं ऐकायला मिळतात – 'मला रीलस्टार व्हायचंय!', 'मला इन्फ्लुएन्सर व्हायचंय!', 'माझे लाखो फॉलोअर्स असतील!' रील्सच्या युगात वाढणाऱ्या पिढीसाठी हे आश्चर्यकारक नाही. कारण रील्स हे आता केवळ मनोरंजनाचं साधन राहिलेलं नाही; ते अनेक मुलांच्या स्वप्नांचा अविभाज्य भाग बनलं आहे. डॉक्टर होण्यासाठी आठ-दहा वर्षे घालवावी लागतात. अभियंता होण्यासाठी पाच-सहा वर्षे मेहनत घ्यावी लागते. उद्योजक होण्यासाठी जोखीम स्वीकारावी लागते. पण रील्स बनवण्यासाठी तुलनेने कमी वेळ लागतो आणि प्रसिद्धी झटपट मिळाल्याचा भास निर्माण होतो.

### क्षणिक प्रसिद्धीचे आकर्षण

रील्स लोकप्रिय होण्यामागे अनेक कारणं आहेत. त्यातील सर्वात महत्त्वाचं कारण म्हणजे त्यांचा अल्प कालावधी. काही सेकंदांत विनोद, नृत्य, माहिती, भावना किंवा संदेश पोहोचतो. आजच्या वेगवान जीवनशैलीत ही शैली मुलांना सहज आकर्षित करते. याशिवाय हे पूर्णपणे ऑडिओ-व्हिज्युअल माध्यम आहे. डोळ्यांना दिसणारं, कानांना ऐकू येणारं आणि सतत बदलणारं कंटेंट मेंदूला पटकन आवडतं. पुस्तक वाचण्यासाठी किंवा एखादं कौशल्य आत्मसात करण्यासाठी संयम लागतो; पण रील्स पाहण्यासाठी बोटाचा फक्त एक स्पर्श पुरेसा असतो.

### 'इन्स्टंट ग्रॅटिफिकेशन' चा सापळा

येथे एक महत्त्वाचा मानसशास्त्रीय मुद्दा लक्षात घ्यायला हवा - इन्स्टंट ग्रॅटिफिकेशन, म्हणजेच तात्काळ समाधान. व्हिडिओ तयार केला आणि काही तासांत हजारो व्ह्यूज



आले, लाईक्स मिळाले, कमेंट्स आल्या की मेंदूला त्वरित आनंदाची अनुभूती मिळते. मेहनत, प्रतीक्षा आणि सातत्याशिवाय प्रसिद्धी मिळाल्याचा भास निर्माण होतो.हळूहळू अनेक विद्यार्थ्यांना वाटू लागतं की यश म्हणजे फॉलोअर्स, लोकप्रियता म्हणजे व्ह्यूज आणि ओळख म्हणजे लाईक्स.

### लोकप्रियता आणि यश यातला मूलभूत फरक

पण इथेच खरी फसगत सुरू होते. रील्समधून मिळणारी लोकप्रियता आणि वास्तविक आयुष्यातील यश या दोन पूर्णपणे वेगळ्या गोष्टी आहेत. काही मोजके लोक या क्षेत्रात खरोखर यशस्वी होतात. त्यामागे सातत्यपूर्ण मेहनत, सर्जनशीलता, कौशल्य, नियोजन आणि व्यावसायिक दृष्टिकोन असतो. पण लाखो मुलांना फक्त यशाचा चमकदार भाग दिसतो; त्यामागचा संघर्ष दिसत नाही.

### विद्यार्थ्यांसाठी धोक्याचे इशारे

काही गोष्टी वेळेवर ओळखणे आवश्यक आहे. सतत फक्त व्ह्यूज, लाईक्स आणि फॉलोअर्सबद्दल विचार करणं. अभ्यास, खेळ, छंद आणि कुटुंबापेक्षा मोबाईलवरील प्रसिद्धी महत्त्वाची वाटणं. स्वतःची तुलना सतत इतर इन्फ्लुएन्सर्सशी करणं. व्हायरल होण्यासाठी धोकादायक स्टंट किंवा वादग्रस्त वर्तन स्वीकारणं. या गोष्टी आत्मविश्वास आणि मानसिक आरोग्यावर परिणाम करू शकतात.

### सर्वात मोठा धोका – स्वतःची ओळख हरवणं

जेव्हा एखादी व्यक्ती सतत इतरांना प्रभावित करण्यासाठी जगू लागते, तेव्हा ती स्वतःचं मूळ व्यक्तिमत्त्व विसरू लागते. विद्यार्थीदशा ही स्वतःला घडवण्याची वेळ असते. कौशल्य विकसित करण्याची, विचार प्रगल्भ करण्याची आणि व्यक्तिमत्त्व समृद्ध करण्याची ही सुवर्णसंधी असते. जर हा काळ फक्त व्हायरल होण्याच्या मागे खर्च झाला, तर पुढे मोठी पोकळी निर्माण होऊ शकते.

### सोशल मीडिया वापरण्याची पद्धत महत्त्वाची

याचा अर्थ सोशल मीडिया वाईट आहे किंवा रील्स बनवणं चुकीचं आहे, असा अजिबात नाही. उलट, योग्य वापर केला तर हे ज्ञान देण्यासाठी, कला सादर करण्यासाठी, सकारात्मक संदेश पोहोचवण्यासाठी, उद्योजकता वाढवण्यासाठी आणि स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी अत्यंत प्रभावी व्यासपीठ ठरू शकतं. मात्र प्रश्न रील्सचा नाही. प्रश्न एवढाच आहे- तुम्ही रील्स वापरत आहात की रील्स तुम्हाला वापरत आहेत?

## स्वतःला हे ५ प्रश्न विचारा

- **माझ्याकडे एखादं खरं कौशल्य आहे का?**
- **प्रसिद्धी नसली तरी मी हे काम आनंदाने करेन का?**
- **सोशल मीडियाशिवाय माझी वेगळी ओळख काय आहे?**
- **माझा अभ्यास, करिअर आणि मानसिक आरोग्य यावर परिणाम होत नाही ना?**
- **मी फक्त ट्रेंडचा पाठलाग करतोय की काही मूल्य निर्माण करतोय?**
- **लक्षात ठेवा : ‘व्हायरल होणं ही घटना असते; पण विश्वासार्ह व्यक्तिमत्त्व घडवणं ही आयुष्यभर चालणारी प्रक्रिया असते.**







## जस्ट जोकिंग










- पूर्वी दोघांचे भांडण सुरु झाले तर तिसरा सोडवायला जायचा आता.. तिसरा त्या भांडणाचा व्हिडिओ बनवतो.

- घरात बायकोने फरशी पुसल्यावर असं चालावं लागतंय... जस की... आतंकवाद्यांनी बॉम्ब पुरवून ठेवलेत.







टीव्ही मालिका

# बोलीचा हेल की खेळ?

**आजचा ग्रामीण महाराष्ट्र वेगाने बदलत आहे. शिक्षण, तंत्रज्ञान, शेती, सामाजिक नातेसंबंध, राजकारण आणि जीवनशैली या प्रत्येक क्षेत्रात गावांनी काळाबरोबर स्वतःला बदलून घेतले आहे. मात्र मराठी दूरचित्रवाणी मालिकांमध्ये दिसणारे गाव अजूनही अनेक दशकांपूर्वीच्या चौकटीत अडकून पडलेले दिसते. कृत्रिम बोलीभाषा, साचेबंद व्यक्तिरेखा आणि वास्तवापासून दूर गेलेले कथानक यांमुळे पडद्यावरील ग्रामीण जीवन आणि प्रत्यक्षातील गाव यांच्यात मोठी दरी निर्माण झाली आहे. या विसंगतीवर नेमके बोट ठेवणारा हा लेख**

**मोहन यादव,** पत्रकार, सांगली

मराठी वाहिन्यांवर ग्रामीण पार्श्वभूमीच्या मालिकांची जंत्री आहे. या सर्व मालिकांत एक गोष्ट प्रकर्षाने खटकते, ती म्हणजे शहरी भागात जन्मलेले आणि वाढलेले अभिनेते-अभिनेत्री कृत्रिमपणे हेल काढत 'म्या', 'कंदी', 'नाय बा', 'नगं', 'व्हय' असे शब्द उच्चारताना दिसतात. तेव्हा ते दृश्य अत्यंत केविलवाणे आणि दयनीय वाटते. अशा प्रकारच्या मालिकांच्या निर्मात्यांना आणि तथाकथित 'प्रतिभाशाली' लेखकांना एक गोष्ट आवर्जून सांगावीशी वाटते की, आजच्या ग्रामीण महाराष्ट्रातील जुनी-नवी पिढी या प्रकारची भाषा बोलत नाही.




## गावाची भाषा बदलली, पण पडद्यावरील तशीच

नव्वदोत्तर काळापूर्वी ग्रामीण भागात जन्मलेल्या पिढीचे शिक्षण, वाचन आणि श्रवण यांची व्याप्ती तुलनेने मर्यादित होती. त्याही आधीच्या काळात ग्रामीण आणि शहरी मराठीत मोठी दरी होती. मात्र गेल्या तीन-चार दशकांत ही दरी मोठ्या प्रमाणावर भरून निघाली आहे. आता फरक उरलाय तो फक्त बोलीचा लहेजा, काही वाक्यरचना आणि किरकोळ व्याकरणात्मक वैशिष्ट्यांचा. तरीही वाहिन्यांवरील ग्रामीण कथानकांतील पात्रे अशा जुनाट शब्दांचा भडीमार करतात तेव्हा तो अतिशय कृत्रिम, तकलादू आणि नाटकी वाटतो. गावे बदलली आहेत

आणि त्यांची भाषा देखील काळानुसार बदलली आहे.

**साचेबंद गाव आणि रटाळ व्यक्तिरेखा**

या मालिकांतील बहुतांश अभिनेते-अभिनेत्रींची जशी गावच्या मातीत नाळ रुजलेली नसते, तशीच काहीशी अवस्था लेखकांचीही दिसते. परिणामी तीच ती घासून-पुसून गुळगुळीत झालेली कथानके, तोच पाटील, तेच सरपंच, तोच पुढारी, तोच गावगुंड, तीच सहनशील स्त्री आणि तिच्यावर अन्याय करणारी दुसरी स्त्री, तीच चूल, तीच पितळी भांडी आणि प्रत्येक सणाला ओढूनताणून आणलेले ट्विस्ट!

**खऱ्या ग्रामीण महाराष्ट्राचे बदलते प्रश्न**

प्रत्यक्षात ग्रामीण महाराष्ट्र यापुढे खूप पुढे गेला आहे. त्याच्या समस्या नव्या आहेत, त्याची दुखणी नवी आहेत आणि त्याच्या अपेक्षाही बदलल्या आहेत. एका बाजूला अल्पवयीन मुलींवरील सामाजिक बंधने अजूनही टिकून आहेत, तर दुसऱ्या बाजूला शेती करणाऱ्या तरुणाला शिकलेली मुलगी नाकारते. आपल्या मुलाने शेती करू नये म्हणून धडपडणारे पालक आहेत, तर पुन्हा शेतीकडे वळणारी नवी पिढीही आहे. गुरे सांभाळावीत की नाही, या द्वंद्वात अडकलेला बळीराजा आहे. शिकलेली सून आणि अशिक्षित सासू यांच्यात समन्वय घडवून आणण्याचा प्रयत्न करणारी कुटुंबे आहेत. वाढलेले खतांचे दर, नापिकी, महागडे शिक्षण आणि आर्थिक कसरत ही आजची खरी ग्रामीण कथा आहे.

**बदललेले राजकारण, समाजकारण**

पूर्वी दहा-बारा एकर असलेली शेती आता विभागणीमुळे एक-दोन एकरांवर आली आहे. ग्रामीण भागात नव्या व्यसनांचे सावट वाढत आहे. राजकारणाचा चेहरा बदलला आहे. वर्गभेद आणि जातीभेद नव्या स्वरूपात समोर येत आहेत. गावांचे गावपण हरवत चालले आहे, तर माणुसकीची उब कमी होत असल्याची खंत अनेकांना वाटते.

**डिजिटल गाव आणि मागासलेले चित्र**

आज गावातील तरुण मोबाईलवरून जगाशी जोडला आहे. स्पर्धा परीक्षांची तयारी करतो, ऑनलाइन व्यवसाय करतो, ड्रोन शेती आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करतो. पण या वास्तवाचे प्रतिबिंब दूरचित्रवाणीवरील कथांमध्ये जवळजवळ दिसतच नाही.

**ग्रामीण वास्तवाला न्याय मिळेल का?**

वाहिन्यांवरील या चित्रात बदल झाला, संशोधनाधिष्ठित लेखन झाले आणि ग्रामीण जीवनाचा जवळून अभ्यास करून कथा लिहिल्या गेल्या, तर लोकांसमोर खऱ्या अर्थाने नव्या ग्रामीण महाराष्ट्राचा चेहरा उभा राहू शकेल. पण सध्या तरी कृत्रिम बोली आणि कालबाह्य साचे यांचाच बोलबाला आहे. आज गरज आहे ती गावाची भाषा नक्कल करून दाखवण्याची नाही, तर गावाच्या मनाचा ठाव घेण्याची. कारण भाषा बदलते, वेश बदलतो, काळ बदलतो; पण मातीचा आत्मा समजून घेण्यासाठी संवेदनशीलता आणि प्रामाणिकपणा आवश्यक असतो.

## आजच्या ग्रामीण महाराष्ट्राची खरी ओळख

- **बोली बदलली आहे; पण स्थानिक लहेजा अजूनही जिवंत आहे.**
- **शेती ही केवळ परंपरा नाही, तर तंत्रज्ञानाशी जोडलेला आधुनिक व्यवसाय बनत आहे.**
- **शिक्षित तरुण गाव सोडतोच असे नाही; अनेकजण नव्या कल्पनांसह पुन्हा गावाकडे परतत आहेत.**
- **मोबाईल, इंटरनेट आणि सोशल मीडियामुळे गाव जागतिक घडामोडींशी जोडले गेले आहे.**
- **महिलांचे शिक्षण, स्वयंसहाय्यता गट आणि उद्योजकता ग्रामीण समाजाचे नवे वास्तव आहे.**
- **जाती, पाणी, शिक्षण, बेरोजगारी आणि शेतीचे अर्थकारण हे आजच्या गावाचे खरे प्रश्न आहेत.**
- **मालिकांमधील 'म्या-कंदी-व्हय'पेक्षा आजच्या गावाची भाषा अधिक सहज, प्रवाही आणि समकालीन आहे.**

# क्रांतीतर्फे ऊस रोपे विक्रीस प्रारंभ ; एक कोटी रोपांचा पुरवठा : पाच फुटी सरी सोडण्याचे आवाहन



*क्रांती सहकारी साखर कारखान्यातर्फे ऊस रोपे विक्रीचा प्रारंभ करण्यात आला*

**कुंडल :** क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड सहकारी साखर कारखाना लि., कुंडल यांच्या अत्याधुनिक ऊस रोपवाटिकेत तयार केलेल्या 'प्लॅस्टिक ट्रे'मधील ऊस रोपांच्या विक्रीचा शुभारंभ कारखान्याचे उपाध्यक्ष जयप्रकाश साळुंखे यांच्या हस्ते झाला.

यावेळी कारखान्याचे संचालक जितेंद्र पाटील, अनिल पवार, दिलीप थोरबोले, अशोक विभुते, माजी संचालक संदीप पवार, कार्यकारी संचालक आप्पासाहेब कोरे, सेक्रेटरी वीरेंद्र देशमुख, चीफ इंजिनियर आशिष चव्हाण, शेती अधिकारी दिलीप पार्लेकर, ऊस विकास अधिकारी विलास जाधव, कार्यालयीन अधीक्षक अविनाश लाड, संजय लाड, हणमंत जाधव, धनाजी गायकवाड, अमोल यादव, किरण लाड, विजय पाटील, सखाराम पवार, भरतकुमार लुपने, प्रेमानंद चव्हाण, धोंडीराम लाड, रावसाहेब पाटील तसेच परिसरातील बहुसंख्य शेतकरी, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी उपाध्यक्ष जयप्रकाश साळुंखे म्हणाले की, पारंपरिक टिपरी पद्धतीऐवजी ऊस रोप लागवड केल्याने खात्रीशीर उगवण, सांधमोडीच्या त्रासातून मुक्तता, पाण्याची बचत आणि ऊस तोडणीसाठी सुमारे एक महिना अगोदरची तारीख मिळण्यासारखे अनेक फायदे शेतकऱ्यांना मिळतात. त्यामुळे कारखाना कार्यक्षेत्रात दरवर्षी सुमारे ६० टक्के क्षेत्रावर रोप पद्धतीने ऊस लागवड केली जाते.

कारखान्याने स्थापनेपासूनच ऊस रोपे तयार करून शेतकऱ्यांना व्यावसायिक लागवडीसाठी तसेच सांधमोडीसाठी उधारीने पुरवठा करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. कारखाना परिसरात सुमारे पाच एकर क्षेत्रावर अत्याधुनिक रोपवाटिका कार्यरत आहे. ४२ कपांच्या प्लॅस्टिक ट्रेचा वापर, कोकोपीट व गांडूळ खताच्या साहाय्याने दर्जेदार रोपांची निर्मिती केली जाते. त्यामुळे कारखान्याच्या ऊस रोपांना शेतकऱ्यांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे.

गतवर्षी कारखान्याने सुमारे ७० लाख ऊस रोपांची निर्मिती केली होती. यंदा एक कोटीहून अधिक रोपे तयार करून शेतकऱ्यांना पुरवठा करण्याचे उद्दीष्ट असल्याची माहिती उपाध्यक्ष जयप्रकाश साळुंखे यांनी दिली.स्वागत, प्रास्ताविक व आभार हर्षल पाटील यांनी मानले.

# ‘क्रांती’ची नवी झेप : यंदा १३ लाख टन ऊस गाळपाचे लक्ष्य

## मिल रोलरचे पूजन ; नवा विक्रम करण्याचा निर्धार : आ. अरुण लाड




*क्रांती कारखान्यात मिल रोलरचे पूजन करताना आ. अरुण लाड, अध्यक्ष शरद लाड, नवनिर्वाचित उपाध्यक्ष जयप्रकाश साळुंखे, संचालक, शेतकरी, कारखान्याच्या विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मान्यवर.*

**कुंडल :** सहकार, गुणवत्ता आणि शेतकरीहित या त्रिसूत्रीवर यशस्वी वाटचाल करणाऱ्या क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड सहकारी साखर कारखान्याने आगामी गळीत हंगामासाठी महत्त्वाकांक्षी पाऊल उचलले आहे. यंदा तब्बल १३ लाख टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. कारखान्याच्या मिल रोलर पूजन सोहळ्यात याची घोषणा करताना कारखान्याचे मार्गदर्शक संचालक तथा आमदार अरुण लाड यांनी शेतकरी आणि सभासदांच्या सर्वांगीण विकासासाठी कारखाना कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार केला.

आगामी ऊस गळीत हंगामाच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या मिल रोलर पूजन कार्यक्रमात कारखान्याच्या प्रगतीचा आढावा घेताना आ. लाड म्हणाले की, “क्रांती कारखान्याचा प्रत्येक यशस्वी हंगाम हा शेतकरी, सभासद, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या एकत्रित परिश्रमांचे फलित आहे. सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देण्याचे काम कारखाना सातत्याने करत आहे. यंदाच्या हंगामात १३ लाख टन ऊस गाळपाचा टप्पा गाठण्याचा निर्धार केला आहे.” कारखान्याच्या यशस्वी वाटचालीचा उल्लेख करताना त्यांनी नुकताच प्राप्त झालेल्या ‘सर्वोत्कृष्ट दर्जाची साखर पुरस्कार’ या राष्ट्रीय सन्मानाचा विशेष उल्लेख केला. “प्रत्येक हंगामात विविध पुरस्कारांनी गौरवला जाणारा ‘क्रांती’ कारखाना गुणवत्तेच्या बाबतीत सातत्याने नवे मापदंड निर्माण करत आहे. हा पुरस्कार केवळ कारखान्याचा नाही, तर प्रत्येक ऊस उत्पादक शेतकऱ्याच्या श्रमांचा सन्मान आहे,” असे ते म्हणाले.

### ऑक्टोबरमध्ये हंगाम सुरू करण्याचे नियोजन

आगामी हंगामासाठी सर्व तयारी अंतिम टप्प्यात असल्याची माहिती देताना आ. लाड यांनी सांगितले की, ऊस तोडणी, वाहतूक व्यवस्था आणि कारखान्यातील अंतर्गत यंत्रसामग्रीची दुरुस्ती वेळेत पूर्ण करण्यात येत

# संपूर्ण तोडणी-वाहतूक यंत्रणा सज्ज

**यंदाच्या गळीत हंगामासाठी ट्रॅक्टर, ट्रक, अंगद गाड्या, बैलगाड्या तसेच हार्वेस्टिंग मशिन्ससह संपूर्ण तोडणी व वाहतूक यंत्रणा सज्ज असल्याचेही अध्यक्ष शरद लाड यांनी स्पष्ट केले. परिसरातील सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आपला ऊस 'क्रांती' कारखान्याकडेच पाठवून सहकाराच्या या चळवळीला अधिक बळ द्यावे, असे आवाहनही केले.**




*पुरस्कार स्वीकारताना शरद लाड, कारखान्याचे वरिष्ठ अधिकारी.*

# क्रांतीची गुणवत्तेवर पुन्हा मोहोर !

## SCIA International Awards तर्फे सर्वोत्कृष्ट पुरस्कार

**कुंडल :** सहकाराच्या बळावर उभारलेली चळवळ, शेतकऱ्यांच्या घामाने फुललेली प्रगती आणि गुणवत्तेच्या सातत्यपूर्ण ध्यासाला पुन्हा एकदा राष्ट्रीय पातळीवर मानाची पावती मिळाली आहे. क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड सहकारी साखर कारखाना लि., कुंडल यांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला. SCIA International Awards 2026 तर्फे कारखान्याला 'सर्वोत्कृष्ट साखर पुरस्कार' (Best Quality Sugar Award) मिळाला आहे.

साखर उद्योगातील अत्यंत प्रतिष्ठेचा समजला जाणारा हा पुरस्कार 'चिनी मंडी' संस्थेच्या वतीने आयोजित Sugar & Ethanol International Awards 2026 सोहळ्यात प्रदान करण्यात आला. या पुरस्काराची घोषणा संस्थेचे फाउंडर तथा जेके ग्रुपचे जितुभाई शहा यांनी केली. मुंबईतील द वेस्टीन, पवई येथे दिमाखदार वातावरणात झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात कारखान्याच्या गुणवत्तापूर्ण कार्याची दखल घेत हा सन्मान बहाल करण्यात आला.

*क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड यांनी रुजविलेल्या सहकाराच्या विचारधारेचा आणि शेतकरी कल्याणाच्या तत्त्वज्ञानाचा वारसा आजही कारखाना तितक्याच निष्ठेने पुढे नेत आहे. बदलत्या काळानुसार आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारतानाच शेतकऱ्यांच्या हिताचे भान जपणारी व्यवस्थापनाची भूमिका हीच या यशामागची खरी ताकद आहे.*
***-शरद लाड,** अध्यक्ष, क्रांती साखर कारखाना*

कारखान्याने उत्कृष्ट दर्जाची साखर निर्मिती, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, उत्पादन प्रक्रियेतील शिस्त, गुणवत्तेचे कठोर निकष, कार्यक्षम व्यवस्थापन आणि शेतकरी हिताला केंद्रस्थानी ठेवणाऱ्या धोरणांची सातत्याने अंमलबजावणी केली आहे. याच दूरदृष्टीमुळे आणि गुणवत्ता जपण्याच्या अविरत प्रयत्नांमुळे कारखान्याला हा प्रतिष्ठेचा सन्मान प्राप्त झाला आहे.

आहे. ऑक्टोबर महिन्यात नियोजित वेळेत गळीत हंगाम सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. "यंदा चांगल्या पावसाची अपेक्षा असून शेतकऱ्यांनी चिंता करण्याचे कारण नाही. कारखान्याच्या विविध ऊस विकास योजनांचा लाभ घेत आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने भरघोस ऊस उत्पादन वाढविण्याकडे लक्ष द्यावे."

या प्रसंगी कारखान्याचे अध्यक्ष शरद लाड, नवनिर्वाचित उपाध्यक्ष जयप्रकाश साळुंखे, संचालक मंडळातील सदस्य, सभासद शेतकरी तसेच कारखान्याच्या विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, '**क्रांतिअग्रणी पर्व**' पाक्षिक, मु.पो. कुंडल - 416 309. ता. पलूस, जि. सांगली (महाराष्ट्र)

हे पाक्षिक संपादक चंद्रकांत लक्ष्मण रोकडे, प्रकाशक उमेश दत्तात्रय पेटकर, मालक अशोक पांडूरंग पवार यांनी मुद्रक लक्ष्मी प्रिंटिंग प्रेस, कुंडल यांचेकडे छापून कुंडल ता. पलूस, जि. सांगली येथून प्रसिध्द केले.

RNI No.: MAHMAR/2008/24954
RND/53/KRANTIAGRANIPARV/2025
SGL/53/2025-2027